**Air quality regulation.** Ecosystems both contribute chemicals to and extract chemicals from the atmosphere, influencing many aspects of air quality;

**Climate regulation.** Ecosystems influence climate both locally and globally. For example, at a local scale, changes in land cover can affect both temperature and precipitation. At the global scale, ecosystems play an important role in climate by either sequestering or emitting greenhouse gases.

**Water regulation.** The timing and magnitude of runoff, flooding and aquifer recharge can be strongly influenced by changes in land cover, including in particular, alterations that change the water storage potential of the system, such as the conversion of wetlands or the replacement of forests with croplands or croplands with urban areas.

**Erosion regulation.** Vegetative cover plays an important role in soil retention and the prevention of landslides.

**Water purification and waste treatment.** Ecosystems can be a source of

**Disease regulation.** Changes in ecosystems can directly change the abundance of human pathogens, such as cholera, and can alter the abundance of disease vectors, such as mosquitoes.

**Pest regulation.** Ecosystem changes affect the prevalence of crop and livestock pests and diseases.

**Pollination.** Ecosystem changes affect the distribution, abundance, and effectiveness of pollinators.

**Natural hazard regulation**. The presence of coastal ecosystems such as mangroves and coral reefs can reduce the damage caused by hurricanes or large waves.

**55%**
**of atmospheric carbon emanating from living organisms is captured by marine organisms, and of this between**
**50-71%**
**is captured by the ocean's vegetated habitats (e.g. mangroves, salt marshes, seagrasses) which cover less than**
**0.5%**
**of the seabed.**

There are a number of coastal ecosystems depending on the local coastal geomorphology and patterns of winds, waves and tides. Some of the important coastal ecosystems are mangroves, coastal lagoons, estuaries, tidal flats and sandy beaches on the landward side; and coral reefs, seagrass beds and submerged rocky patches in the sea. Each ecosystem provides different services with varying levels of importance from our (human) point of view. The importance of the different services may vary according to the local community as well. Describing the en- vironment in terms of ecosystem services helps in translating the complexity of the environment into a series of functions that can be readily understood, and also provide a better understanding of what is being gained or lost when resource exploitation or development takes place (Beaumont et al., 2007).

PROVISIONING
(products obtained from the ecosystem)

REGULATING
(benefits available from the regulation of ecosystem processes)

CULTURAL
(non-material benefits that people obtain from ecosystems)

SUPPORTING: (services that are necessary for the other three but do not yield direct benefit to humans)



## 1.6.3 नियामक सेवा

नियामक सेवा हे परिस्थितीक व्यवस्था प्रक्रियांच्या नियमनातून लोकांनी मिळवलेले लाभ असतात, यामध्ये हवेच्या गुणवत्तेची देखभाल, हवामानाचे नियमन, कार्बन पकडणे, मानवी आजारांचे नियमन, वनस्पतींवरील कीड आणि रोग नियंत्रण, पाण्याचे शुध्दीकरण, नैसर्गिक धोका आणि आपत्तीची जोखिम कमी करणे (दरडी कोसळणे, पूर व त्सुनामीसारख्या घटनांचे धोके कमी करणे) परागीभवन इ. चा समावेश होतो. परिस्थितीक व्यवस्था प्रक्रियांच्या नियमनातून मिळवलेल्या लाभांमध्ये समावेश होतो:

**हवेच्या गुणवत्तेचे नियमन.** परिस्थितीक व्यवस्था वातावरणात रसायने सोडणे आणि शोषून घेणे ह्या दोन्हींमध्ये योगदान करतात, ज्यामुळे हवेच्या गुणवत्तेच्या अनेक घटकांवर परिणाम होतो;

**हवामानाचे नियमन.** परिस्थितीक व्यवस्थेचा स्थानिक पातळीवरील आणि जागतिक स्तरावरील दोन्ही हवामानांवर प्रभाव पडतो. उदाहरणार्थ, स्थानिक पातळीवर, जमिनीच्या आच्छादनातील बदल हे तापमान आणि पर्जन्य दोन्हींवर परिणाम करू शकतात. जागतिक पातळीवर, परिस्थितीक व्यवस्था हरित वायू वेगळा करण्याद्वारे किंवा त्याच्या उत्सर्जनाद्वारे हवामानाच्या बाबतीत महत्वाची भूमिका बजावते.

**पाण्याचे नियमन.** ज्पृष्ठवाह, पूर येणे आणि जलधारक रिचार्ज यांची वेळ आणि आवाका यांच्यावर जमिनीतील आच्छादनामधील बदलाचा तीव्र प्रभाव पडू शकतो, ज्यात विशेष करून दलदलीच्या प्रदेशांचे परिवर्तन किंवा वनांचे पीकजमीन किंवा शहरी क्षेत्रांसह पीकजमिनीत बदल होणे अशा यंत्रणेच्या जल संचय क्षमतेत बदल करणार्‍या फेरबदलांचा समावेश असतो.

**धुप नियमन.** जमीन धारण आणि दरडी कोसळण्यास प्रतिबंध यामध्ये वनस्पतींच्या आच्छादनाची महत्वाची भूमिका असते.

**जल शुध्दीकरण आणि जल उपचार.** परिस्थितीक व्यवस्था याचा स्त्रोत असू शकतात.

**रोग नियमन.** परिस्थितीक व्यवस्थेतील बदल मानवी रोगकारकांची बहुलता थेट बदलू शकतात, जसे की क्लोरिया आणि रोग सदिशाची बहुलता बदलू शकतात, जसे की डास.

**कीड नियमन.** म्परिस्थितीक व्यवस्थेतील बदल पीक आणि पशुधनावरील कीड व रोगांच्या प्राबल्यावर परिणाम करू शकतो.

**परागीभवन.** परिस्थितीक व्यवस्थेतील बदल पॉलिनेटर्सच्या वितरण, बहुलता, आणि प्रभावीपणावर परिणाम करतात.

**नैसर्गिक धोका नियमन.** किनारी परिस्थितीक व्यवस्थेची उपस्थिती जसे की खारफुटी आणि प्रवाळ बेटे चक्री वादळे किंवा मोठ्या लाटांमुळे होणारे नुकसान कमी करू शकतात. सजीवांकडून उत्सर्जित केला जाणारा

**सजीव प्राण्यांद्वारा उत्सर्जित**
**55 टक्के**
**कार्बन समुद्री जीवांद्वारा शोषले जाते, आणि यातील**
**50-71 टक्के**
**महासागरारील वनस्पती वस्त्यांद्वारा (उदा. खारफुटी, मिठाच्या दलदली, समुद्री गवत) शोषले जाते, ज्याची व्याप्ती समुद्राखालील जमिनीच्या**
**0-5 टक्क्यांपेक्षा**
**कमी आहे.**

स्थानिक किनारपट्टीवरील भूरूपिकी आणि वारा, लाटा आणि भरतीच्या पॅटर्न्सवर अनेक किनारी परिस्थितीक व्यवस्था अवलंबून आहेत. काही महत्वाच्या किनारी परिस्थितीक व्यवस्था आहेत जमिनीच्या बाजूने असलेली खारफुटी, किनारी खाऱ्या पाण्याची सरोवरे, नदी मुखे, टायडल फ्लॅट्स आणि वालुकामय किनारे. आणि प्रवाळ बेटे, समुद्री गवताचे पट्टे आणि समुद्रात पाण्याखाली गेलेले खडकाळ जमिनीचे तुकडे. प्रत्येक परिस्थितीक व्यवस्था आपल्या (मानवी) दृष्टीकोनातून महत्वाबाबत बदलत्या पातळ्या असलेल्या सेवा प्रदान करते. भिन्न सेवेचे महत्व स्थानिक समुदायानुसारही बदलू शकते. परिस्थितीक व्यवस्था सेवेच्या दृष्टीने पर्यावरणाचे वर्णन करण्यामुळे पर्यावरणाच्या गुंतागुंतीचे सहजपणे समजणाऱ्या कार्यांच्या मालिकेत भाषांतर करण्यास मदत होते आणि साधनस्त्रोतांची पिळवणूक होत असताना किंवा विकास घडत असताना काय मिळवले व काय गमावले ह्याबाबत अधिक चांगली समज येते (बीमॉंट एट अल., 2007).

पुरवठा
(परिस्थितीक व्यवस्थेतून मिळवलेली उत्पादने)

नियमन करणे
(परिस्थितीकी प्रक्रियांच्या नियमनातून मिळणारे लाभ)

सांस्कृतिक
(परिस्थितीक व्यवस्थेतून लोकांना मिळणारे अभौतिक लाभ)

आधारभूत: (अशा सेवा ज्या इतर तीन बाबींसाठी आवष्यक आहेत, परंतु मानवाला थेट लाभ देत नाहीत)

### 1.6.4 Cultural services

Cultural services are the nonmaterial benefits people obtain from ecosystems such as spiritual enrichment, religious and cultural value (sacred sites), knowledge systems, educational values, aesthetic values, social relations (in urban green spaces), and recreation and ecotourism. Spiritual and religious value refers to religious bonds to sacred landscapes, groves and species (Butler, 2006) which is often connected to different religions. For example, the Khecheopalri Lake in Sikkim in northeast India, is considered to be sacred both by Buddhists and the Hindus of Sikkim. The World Heritage Convention acknowledges ecosystem services provided by cultural landscapes.

These are the nonmaterial benefits people obtain from ecosystems through spiritual enrichment, cognitive development, reflection, recreation, and aesthetic experiences, including:

**Cultural diversity.** The diversity of ecosystems is one factor influencing the diversity of cultures.

**Spiritual and religious values.** Many religions attach spiritual and religious values to ecosystems or their components.

**Knowledge systems (traditional and formal).** Ecosystems influence the types of knowledge systems developed by different cultures.

**Educational values.** Ecosystems and their components and processes provide the basis for both formal and informal education in many societies.

**Inspiration.** Ecosystems provide a rich source of inspiration for art, folklore, national symbols, architecture, and advertising.

**Aesthetic values.** Many people find beauty or aesthetic value in various aspects of ecosystems, as reflected in the support for parks, scenic drives, and the selection of housing locations.

**Social relations.** Ecosystems influence the types of social relations that are established in particular cultures. Fishing societies, for example, differ in many respects in their social relations from nomadic herding or agricultural societies.

**Sense of place.** Many people value the “sense of place” that is associated with recognised features of their environment, including aspects of the ecosystem.

**Cultural heritage values.** Many societies place high value on the maintenance of either historically important landscapes (‘cultural landscapes’) or culturally significant species.

**Recreation and ecotourism.** People often choose where to spend their leisure time based in part on the characteristics of the natural or cultivated landscapes in a particular area.

### 1.6.5 Supporting services

Supporting services are those that are necessary for the production of all other ecosystem services, such as biomass production, production of atmospheric oxygen, soil formation and retention, nutrient cycling, water cycling, and provisioning of the habitat. A very prominent example for this type of service is the value of an intact forest in the vicinity of agriculture fields, which provides soil nutrients and maintains soil productivity of the agriculture field.

### 1.6.4 सांस्कृतिक सेवा

सांस्कृतिक सेवा म्हणजे लोकांना परिस्थितीक व्यवस्थेमधून मिळणारे अभौतिक लाभ जसे की आध्यात्मिक संपन्नता, धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्य (पवित्र ठिकाणे), ज्ञान प्रणाली, शैक्षणिक मूल्ये, सौंदर्याबाबतची मूल्ये, सामाजिक संबंध (शहरी हरित जागांमध्ये) आणि मनोरंजन व इको–टुरिझम. धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्य म्हणजे पवित्र भुदृश्ये, उपवने आणि प्रजातींशी असलेले धार्मिक बंध (बटलर, 2006) जे अनेकदा विविध धर्मांशी जोडलेले असतात. उदाहरणार्थ, ईशान्य भारत सिक्कीममध्ये असलेले खेचोपालरी सरोवर हे बौद्ध व हिंदू दोन्ही लोक पवित्र मानतात. सांस्कृतिक भुदृश्यांनी प्रदान केलेल्या परिस्थितीक व्यवस्था सेवांची जागतिक वारसा परिषद दखल घेते.

आध्यात्मिक संपन्नता, संज्ञानात्मक विकास, प्रतिबिंब, मनोरंजन, सौंदर्याचा अनुभव याद्वारे लोकांना मिळणारे हे अभौतिक लाभ आहेत, यांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो:

**सांस्कृतिक वैविध्य.** सांस्कृतिक वैविध्यास प्रभावित करणारे परिस्थितीक व्यवस्थेचे वैविध्य हा एक घटक आहे.

**आध्यात्मिक आणि धार्मिक मूल्ये.** अनेक धर्म परिस्थितीक व्यवस्था किंवा त्यांच्या घटकांना आध्यात्मक आणि धार्मिक मूल्ये जोडतात

**ज्ञान यंत्रणा (पारंपारिक आणि औपचारिक).** परिस्थितीक व्यवस्था विविध संस्कृतींद्वारे विकसीत होणाऱ्या ज्ञान यंत्रणांना प्रभावित करते.

**शैक्षणिक मूल्ये.** परिस्थितीक व्यवस्था आणि त्यांचे घटक आणि प्रक्रिया अनेक समाजांमध्ये औपचारिक व अनौपचारिक दोन्ही शिक्षणासाठीचा पाया देते.

**प्रेरणा.** परिस्थितीक व्यवस्था कला, लोककला, राष्ट्रीय चिन्हे, वास्तुकला व जाहिरातींसाठी प्रेरणेचा समृध्द स्त्रोत प्रदान करते.

**सौंदर्यविषयक मूल्ये.** अनेक लोकांना परिस्थितीक व्यवस्थेच्या विविध घटकांमध्ये सौंदर्य किंवा सौदर्यविषयक मूल्ये आढळतात, जी बगिचे, निसर्गरम्य ड्राइव्ह्ज आणि गृहनिर्माण ठिकाणांच्या निवडीमध्ये प्रतिबिंबित होतात.

**सामाजिक संबंध.** एखाद्या ठराविक संस्कृतीमध्ये ज्या प्रकारचे सामाजिक संबंध प्रस्थापित होतील त्यावर परिस्थितीक व्यवस्था परिणाम करते. उदाहरणार्थ, मासेमारी करणारा कोळी समाज हा भटक्या जमाती किंवा कृषी समाजाहून सामाजिक संबंधांमध्ये अनेक प्रकारे भिन्न असतो.

**जागेची समज.** अनेक लोक ”जागेची समज“ या संकल्पनेस महत्व देतात जी त्यांच्या परिस्थितीक व्यवस्थेसह त्यांच्या पर्यावरणातील मान्यताप्राप्त वैशिष्ट्यांशी निगडीत असते.

**सांस्कृतिक वारसा मूल्ये**. अनेक समाज ऐतिहासिकरित्या महत्वाच्या भुदृश्यांच्या देखभालीस (‘सांस्कृतिक भुदृश्ये’) किंवा सांस्कृतिकदृष्ट्या ठळक प्रजातींच्या देखभालीला अतिशय महत्व देतात.

**मनोरंजन आणि इकोटूरिझम.** एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील नैसर्गिक किंवा लागवड केलेल्या क्षेत्रफळातील विशिष्ट भागाची लोक अनेकदा आपला मोकळा घालविण्यासाठी निवड करतात.

### 1.6.5 आधारभूत सेवा

आधारभूत सेवा म्हणजे ज्या इतर सर्व परिस्थितीक व्यवस्था सेवांच्या उत्पादनासाठी आवश्यक आहेत जसे की बायोमास उत्पादन, वातावरणातील ऑक्सिजनचे उत्पादन, जमीन तयार होणे व टिकून राहणे, पोषण घटक चक्र, जल चक्र आणि वस्त्यांचा पुरवठा. अशा प्रकारच्या सेवांचे एक अतिशय ठळक उदाहरण म्हणजे कृषी क्षेत्राच्या परिसरात अबाधित असलेले एखादे जंगल, जे जमिनीची पोषक तत्वे प्रदान करते आणि कृषी क्षेत्रातील जमिनीची उत्पादकता राखते.

Table: A quick overview of various ecosystem services along with examples and the relative importance in terms of contribution by various coastal and marine ecosystems. The classification in the first column is adapted from Beaumont et al, 2007.

| SERVICE | EXAMPLES | Mangroves | Coral reefs | Seagrass beds | Coastal lagoons | Submerged rocks | Tidal flats | Salt marshes | Sandy beaches | Estuaries |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Provisioning services:** | | | | | | | | | | |
| **Goods and products obtained from ecosystems** | | | | | | | | | | |
| Food | Fish, shellfish | H | H | M | M | | L | | | H |
| | Seaweed | | L | | | H | | | | |
| | Non Timber Forest Products (NTFP) | H | | | | | | | | |
| Raw materials | Timber, firewood, charcoal | H | | | | | | | | |
| | Alginates, carrageenan, various pharmaceuticals from seaweed | | L | | | | H | | | |
| | Biochemicals, natural medicines, pharmaceuticals | | | | | | | | | |
| | Construction material (coral blocks) | | M | | | | | | | |
| Others | Freshwater | M | | | M | | | | | |
| | Genetic resources | H | H | L | M | L | | | | M |
| **Regulating services** | | | | | | | | | | |
| Gas and climate regulation | Regulation of local air quality | H | | | | | | | | |
| | Regulation of global climate | H | M | M | L | | | M | | |
| Disturbance prevention (flood and storm protection, erosion control) | Reduction of wave energy reaching coastline; control of storm surge, wind break | H | H | M | | | M | M | H | |
| Bioremediation of waste | Water purification and waste treatment | H | | M | M | | H | H | M | H |
| **Cultural services** | | | | | | | | | | |
| Leisure and recreation | Recreation and ecotourism | H | H | L | L | | M | L | H | |
| Cultural heritage and identity | Ethical and spiritual values | H | H | | | | | | M | |
| Cognitive values | Education and inspirational values | H | H | | | | H | | H | |
| Existence values | Existence – present and potential future benefits | H | H | H | H | M | M | M | H | |
| **Supporting services** | | | | | | | | | | |
| Biologically mediated habitat | Habitat | H | H | M | M | L | L | | | |
| Nutrient cycling | Nutrient cycling | H | H | H | H | | M | M | | |
| | Carbon sequestration | H | H | H | L | | | H | | |
| Life Support | Primary production | H | L | H | H | M | L | M | | |
| | Water cycling | H | | | M | | | L | L | |

तक्ता: विविध परिस्थितीक व्यवस्था सेवा आणि विविध किनारी आणि समुद्री परिस्थितीक व्यवस्थेच्या योगदानाच्या स्वरूपात तुलनात्मक महत्व यांचे उदाहरणांसह एक झटपट विहंगावलोकन. पहिल्या रकान्याचे वर्गीकरण बीमॉंट एट अल., 2007 मधून घेतलेले आहे.

| सेवा | उदाहरणे | खारफुटी | प्रवाळ बेटे | समुद्रीगवताचे पट्टे | किनारी खाऱ्या पाण्याची सरोवरे | पाण्याखाली गेलेले खडक | टायडल फ्लॅट्स | मिठाच्या दलदली | वालुकामय किनारे | नदी मुखे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पुरवठा सेवा:** | | | | | | | | | | |
| परिस्थितीक व्यवस्थेतून मिळवलेल्या वस्तू व उत्पादने | | | | | | | | | | |
| अन्न | मासे, शेलफिश | H | H | M | M | | L | | | H |
| | समुद्रशैवाल | | L | | | H | | | | |
| | लाकडा व्यतिरिक्त जंगलातील उत्पादने (NTFP) | H | | | | | | | | |
| कच्चा माल | लाकूड, जळाऊ लाकूड, कोळसा | H | | | | | | | | |
| | अल्गिनेट्स, कारागीनन, समुद्रीशैवालापासूनची विविध औषधोत्पादने | | L | | | | H | | | |
| | जैवरसायने, नैसर्गिक औषधे, औषधोत्पादने | | | | | | | | | |
| | बांधकाम साहित्य (प्रवाळांचे खडक) | | M | | | | | | | |
| इतर | ताजे पाणी | M | | | M | | | | | |
| | जनुकीय साधनस्त्रोत | H | H | L | M | L | | | | M |
| **नियामक सेवा** | | | | | | | | | | |
| वायू आणि हवामान नियमन | स्थानिक हवेच्या गुणवत्तेचे नियमन | H | | | | | | | | |
| | जागतिक हवामानाचे नियमन | H | M | M | L | | | | M | |
| अडथळ्यास प्रतिबंध (पूर आणि वादळापासून संरक्षण, धूप नियंत्रण) | किनारपट्टीवर पोहोचणाऱ्या लाटांच्या उर्जेमध्ये घट, वादळे, वारा यांचे नियंत्रण | H | H | M | | | | M | M | H |
| कचऱ्याचे जैविक उपाय | जल शुध्दीकरण आणि कचऱ्यावरील उपचार. | H | | M | M | | H | H | M | H |
| **सांस्कृतिक सेवा** | | | | | | | | | | |
| मोकळा वेळ व मनोरंजन | मनोरंजन आणि इकोटूरिझम | H | H | L | L | | M | L | H | |
| सांस्कृतिक वारसा आणि ओळख | नैतिक आणि आध्यात्मक मूल्ये | H | H | | | | | | M | |
| संज्ञानात्मक मूल्ये | शैक्षणिक आणि प्रेरणात्मक मूल्ये | H | H | | | | H | | H | |
| अस्तित्वात असल्याची मूल्ये | अस्तित्वात असणे – वर्तमानात व भविष्यातील संभाव्य लाभ | H | H | H | H | M | M | M | H | |
| **आधारभूत सेवा** | | | | | | | | | | |
| जीवशास्त्रीयरित्या मध्यस्थी वस्त्या | वस्त्या | H | H | M | M | L | L | | | |
| पोषण घटक चक्र | पोषण घटक चक्र | H | H | H | H | | M | M | | |
| | कार्बन अलगीकरण | H | H | H | L | | | H | | |
| जीवन सहयोग | प्राथमिक उत्पादन | H | L | H | H | M | L | M | | |
| | पाण्याचे चक्र | H | | | M | | | L | L | |



# 1.7 Different types of terrestrial and coastal and marine biomes and habitats

Ecological communities of living things, such as microorganisms, plants and animals form as a result of the physical surroundings, including land, air and water in an area. For example, deserts, grasslands and tropical rainforests are biomes.

# 1.7 विविध प्रकारचे भूप्रदेशीय व किनारी आणि समुद्री बायोम्स व वस्त्या

सजिवांचे परिस्थितीक समाज, जसे की परिसरात असलेल्या जमीन, हवा व पाण्यासह भौतिक परिसराच्या परिणामी सूक्ष्मजीव, वनस्पती आणि प्राणी घडतात. उदाहरणार्थ, वाळवंटे, कुरणे आणि उष्णकटिबंधीय पर्जन्यवने हे बायोम्स आहेत.



Water is the common link among the five biomes and it covers the largest part of the biosphere, consisting of nearly 75 per cent of the earth's surface. Aquatic regions house numerous species of plants and animals, both large and small. In fact, this is where life began billions of years ago when amino acids first started to come together. Without water, most life forms would be unable to sustain themselves and the earth would be a barren, desert-like place. Although water temperatures can vary widely, aquatic areas tend to be more humid and air temperature on the cooler side.

The aquatic biome can be broken down into two basic regions, freshwater and coastal-marine.

**Classification of biomes**

Aquatic biomes
- Freshwater
- Ponds and lakes
- Rivers and streams
- Wetlands

Coastal
- Mangroves
- Tidal mudflats
- Lagoons
- Sandy beaches
- Rocky shores
- estuaries

Marine
- Oceans
- Coral reefs
- Seagrasses
- Deep sea

Desert biome
- Hot and dry deserts
- Semi-arid deserts
- Coastal deserts
- Cold deserts

Grasslands
- Steppes
- Prairies
- Pampas
- Savannas

Forests
- Tropical forests
- Deciduous forests
- Alpine forests
- Boreal forests or Taiga

## 1.7.1 Freshwater regions

Fresh Water is a basic requisite of life on mother earth, and is available in aquifers under the ground and on surface as rivers and lakes (Gupta, 2005). Freshwater has a low salt concentration — usually less than 1 per cent. Plants and animals in freshwater regions are adjusted to the low salt content and will not be able to survive in areas of high salt concentration (i.e, ocean).

India has about 4% of world's freshwater resources ranking it among the top ten water rich countries. Despite this, according to the Working Group II report of the Fourth Assessment of the Intergovernmental Panel on Climate Change, India is designated a 'water stressed region' with current utilisable freshwater standing at 1122 cubic meter (cu m) per year and per capita compared to international limiting standards of 1700 cu m (Arghyam, 2009).

There are different types of freshwater regions. The following sections describe the characteristics of these regions.

### 1.7.1.1 Ponds and Lakes

These regions range in size from just a few square metres to thousands of square kilometres. Scattered throughout the earth, several are remnants from the Pleistocene glaciation. Many ponds are seasonal, lasting just a couple of months (such as sessile pools) while lakes may exist for hundreds of years or more. Ponds and lakes may have limited species diversity since they are often isolated from one another and from other water sources like rivers and oceans. Lakes and ponds are divided into three different 'zones' which are usually determined by depth and distance from the shoreline.

पाच बायोम्समधील पाणी हा सामाईक दुवा आहे आणि जीवावरणाचा सर्वात मोठा भाग आच्छादित करते, ज्यामध्ये पृथ्वीच्या पृष्ठभागाचा जवळजवळ 75 टक्के भाग समाविष्ट होतो. जलीय प्रदेशांमध्ये लहान व मोठ्या वनस्पती व प्राण्यांच्या असंख्य प्रजाती निवास करतात. खरे तर, अनेक अब्ज वर्षांपूर्वी जेव्हा अमिनो आम्ले पहिल्यांदा एकत्र यायला लागली तेव्हा इथेच जीवनाला प्रारंभ झाला. पाण्याशिवाय, बहुतांश स्वरूपातील जीवने स्वतःला टिकवून ठेवू शकणार नाहीत आणि पृथ्वी वाळवंटासारखी रूक्ष होईल. जरी पाण्याचे तापमान मोठ्या प्रमाणावर बदलू शकत असले तरी, जलीय क्षेत्रे अधिक दमट असतात आणि हवेचे तापमान जास्त थंड असते.

जलीय बायोमचे दोन मुलभूत प्रदेशांमध्ये वर्गीकरण करता येते, ताज्या पाण्याचे आणि किनाऱ्यावरील समुद्री प्रदेश.

**बायोम्सचे वर्गीकरण**

जलीय बायोम्स
- ताजे पाणी
- तलाव आणि सरोवरे
- ओढे आणि नद्या
- दलदलीचे प्रदेश

किनारी
- खारफुटी
- टायडल मडफ्लॅट्स
- लगून्स
- वालुकामय किनारे
- खडकाळ किनारे
- नदी मुखे

समुद्री
- महासागर
- प्रवाळ बेटे
- समुद्री गवत
- खोल समूद्र

वाळवंटातील बायोम
- उष्ण आणि कोरडी वाळवंटे
- अर्ध–रखरखीत वाळवंटे
- किनारी वाळवंटे
- थंड वाळवंटे

कुरणे
- स्टेपी
- प्रैरी
- पंपास
- सवाना

जंगले
- उष्णकटिबंधीय जंगले
- पानगळीची जंगले
- अल्पाईन जंगले
- बोरीअल जंगले किंवा तैगा

## 1.7.1 ताज्या पाण्याचे प्रदेश

धरतीमातेची मुलभूत आवश्यकता म्हणजे ताजे पाणी आहे आणि जमिनीखालील छिद्रांमध्ये तसेच पृष्ठभागावर नद्या व तळ्यांमध्ये ते उपलब्ध असते (गुप्ता, 2005). ताज्या पाण्यामध्ये मिठाचे केंद्रीकरण कमी असते – सहसा 1 टक्क्याहून कमी. ताज्या पाण्याच्या प्रदेशातील वनस्पती आणि प्राण्यांना कमी मीठाची सवय असते आणि खूप जास्त मिठाचे केंद्रिकरण असलेल्या ठिकाणी जगू शकत नाहीत (म्हणजेच, समुद्र )

भारतामध्ये संपूर्ण जगातील 4 टक्के ताज्या पाण्याचे साधनस्त्रोत आहेत ज्यामुळे जगातील दहा पाण्याने समृध्द देशांमध्ये भारताची वर्णी लागते. असे असूनही, हवामान बदलावरील चौथ्या आंतरसरकारी पॅनेलच्या चौथ्या मूल्यमापनाच्या कार्यरत गट 2 अहवालानुसार, 1700 घन मीटरच्या आंतरराष्ट्रीय मर्यादा मापदंडांच्या (अर्घ्याम, 2009) तुलनेत सध्या दरडोई वार्षिक 1122 घन मीटर (cu m) असलेल्या पाण्याच्या वापरामुळे भारत सर्वाधिक 'पाण्याचा तणाव असलेला प्रदेश' बनणार आहे.

विविध प्रकारचे ताज्या पाण्याचे प्रदेश आहेत. खालील विभाग ह्या प्रदेशांच्या वैशिष्ट्यांचे वर्णन करतात.

### 1.7.1.1 तलाव आणि सरोवरे

हे प्रदेश काही चौरस मीटर पासून ते हजारो चौरस किलोमीटरपर्यंत पसरलेले असतात. प्लाइस्टोसीन हिमायनपासून संपूर्ण पृथ्वीवर विखुरलेले अनेक अवशेष आहेत. अनेक तलाव हे हंगामी असतात, जे केवळ दोन महिने टिकतात (सेसाईल डोह) तर सरोवरे शेकडो वर्षे किंवा त्याहून जास्त अस्तित्वात असू शकतात. तलाव आणि सरोवरांमध्ये मर्यादित प्रजाती वैविध्य असू शकते कारण ते बहुतेकदा परस्परांपासून आणि नद्या व महासागरांसारख्या इतर जल स्त्रोतांपासून दूर असतात. तलाव आणि सरोवरांचे तीन भिन्न 'क्षेत्रांमध्ये' विभाजन केले जाते, जी सहसा किनारपट्टीपासूनची खोली व अंतर यानुसार ठरवली जातात.

The topmost zone near the shore of a lake or pond is the littoral zone. This zone is the warmest since it is shallow and can absorb more of the sun's heat. It sustains a fairly diverse community, which can include several species of algae (like diatoms), rooted and floating aquatic plants, grazing snails, clams, insects, crustaceans, fishes, and amphibians. In the case of the insects, such as dragonflies and midges, only the egg and larvae stages are found in this zone. The vegetation and animals living in the littoral zone are food for other creatures such as turtles, snakes and ducks.

The near-surface open water surrounded by the littoral zone is the limnetic zone. The limnetic zone is well-lit (like the littoral zone) and is dominated by plankton, both phytoplankton and zooplankton. Plankton are small organisms that play a crucial role in the food chain. Without aquatic plankton, there would be few living organisms in the world, and certainly no humans. A variety of freshwater fish also occupy this zone.

Plankton have short life spans. When they die, they fall into the deep-water part of the lake/pond, the profundal zone. This zone is much colder and denser than the other two. Little light penetrates all the way through the limnetic zone into the profundal zone. The fauna are heterotrophs, meaning that they eat dead organisms and use oxygen for cellular respiration.

India is house to some of the most beautiful lakes of the world, some natural, others artificial. They are there in the high Himalayas under the ice sheath, in the virgin northeast, semi-arid deserts of Rajasthan, coastal zones, or in metros, small towns and villages. In India, lakes serve as source of water for drinking, agriculture, and even industries. It acts as sewage absorbers, flood cushions and recharge zones for groundwater aquifers. It is an ecosystem where a variety of birds and animals breed; pisciculture, and aquaculture thrive leading to a source of income for people. Lake tourism is an immensely profiting sector. In India, there are urban and rural lakes along with natural water bodies which have been categorized under the Ramsar Convention on Wetlands (1971) and are important mostly from ecological sustenance and as a source of livelihood for many people (Arghyam, 2009).

### 1.7.1.2 Streams and rivers

These are bodies of flowing water moving in one direction. Streams and rivers can be found everywhere—they get their starts at headwaters, which may be springs, snowmelt or even lakes, and then travel all the way to their mouths, usually another water channel or the ocean. The characteristics of a river or stream change during the journey from the source to the mouth. The temperature is cooler at the source than it is at the mouth. The water is also clearer, has higher oxygen levels, and freshwater fish such as trout and heterotrophs can be found there. Towards the middle part of the stream/river, the width increases, as does species diversity—numerous aquatic green plants and algae can be found. Toward the mouth of the river/stream, the water becomes murky from all the sediments that it has picked up upstream, decreasing the amount of light that can penetrate through the water. Since there is less light, there is less diversity of flora, and because of the lower oxygen levels, fish that require less oxygen, such as catfish and carp, can be found.

India's river system is large and well watered. Twelve major river with a number of smaller rivers and streams. Seven major rivers make the river system of India. The Ganges-Brahmaputra and the Indus systems are the largest as they drain almost half of the country carrying more than 40% of the utilisable surface water. All major rivers of India originate from one of the three main watersheds - a) The Himalaya and the Karakoram ranges, b) Vindhya and Satpura ranges and Chotanagpur plateau in central India and c) Sahyadri or Western Ghats in western India.  Over 70% of India's rivers drain into the Bay of Bengal, mostly as part of the Ganges-Brahmaputra system. The Arabian Sea receives 20% of the total drainage from the Indus and other rivers. The remaining

एखाद्या तलाव किंवा सरोवराजवळील सर्वात जवळील सर्वोच्च क्षेत्र म्हणजे लिटरल झोन. हे क्षेत्र सर्वात उष्ण असते कारण ते उथळ असते आणि सूर्याची सर्वाधिक उष्णता शोषून घेऊ शकते. त्यामध्ये बऱ्यापैकी वैविध्यपूर्ण समुदाय असतो, ज्यामध्ये शेवाळांच्या अनेक प्रजाती (जसे की करंडक वनस्पती), मूळ धरलेल्या आणि तरंगत्या जलीय वनस्पती, चरणाऱ्या गोगलगाई, क्लॅम्स, किडे, कवची अपृष्ठवंषीय, मासे व उभयचरांचा समावेश होतो. ड्रॅगनफ्लाय आणि पतंगांसारख्या किड्यांच्या बाबतीत, ह्या क्षेत्रामध्ये केवळ अंडी आणि आळ्यांच्या अवस्था ह्या क्षेत्रात आढळतात. लिटरल झोनमध्ये असणारी झाडे आणि प्राणी ही इतर प्राण्यांचे अन्न असतात जसे की कासवे, साप आणि बदके.

लिटरल झोनद्वारे वेढलेले पृष्ठभागाजवळील खुले पाणी म्हणजे सरोवरी क्षेत्र. सरोवरी क्षेत्र हा चांगल्या प्रकारे प्रकाश असलेला (लिटरल झोनसारखा) आणि फायटोप्लॅंक्टन आणि झू– प्लॅंक्टन या दोन्ही प्लॅंक्टनचे (पाण्यात नुसते तरंगणारे सजीव) वर्चस्व असणारा असतो. प्लॅंक्टन हे लहान जीव असतात जे अन्न साखळीमध्ये महत्वाची भूमिका बजावतात. जलीय प्लॅंक्टनविना, जगामध्ये अगदी मोजके सजीव राहतील आणि मानव तर नक्कीच राहणार नाहीत. विविध प्रकारचे ताज्या पाण्यातील मासेही हा झोन व्यापतात.

प्लॅंक्टनचे आयुष्य कमी असते. ते मरतात तेव्हा ते सरोवर/तळ्याच्या खोल–पाण्याच्या भागात पडतात, प्रोफंडल झोन. हा झोन बाकी दोनपेक्षा खूपच थंड आणि खोल असतो. सरोवरी क्षेत्रामधून प्रोफंडल झोनमध्ये खूपच कमी प्रकाश झिरपतो. ह्या प्रदेशातील जीव परोपजिवी असतात म्हणजे ते मृत जीवांना खातात आणि पेशीय श्‍वसनासाठी ऑक्सिजन वापरतात.

भारतामध्ये जगातील काही सर्वात सुंदर सरोवरे आहेत, ज्यांच्यापैकी काही नैसर्गिक आहेत तर काही कृत्रिम. ती उंच हिमालयात बर्फाच्या आवरणाखाली आहेत, कुमारी ईशान्येला, राजस्थानच्या अर्ध–रखरखीत वाळवंटात, किनारी क्षेत्रांमध्ये किंवा महानगरे, लहान शहरे व गावांत आहेत. भारतामध्ये, सरोवरांचा वापर पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत म्हणून, शेती आणि अगदी उद्योगांसाठीही केला जातो. ते सांडपाणी सामावून घेण्यासाठी, पूरासाठी गादीप्रमाणे आणि जमिनीतील पाण्याच्या सछिद्र खडकांना पुनरुज्जिवीत करणारी क्षेत्रे म्हणून काम करतात. ती एक परिस्थितीक व्यवस्था आहे ज्यामध्ये विविध पक्षी आणि प्राण्यांच्या जाती प्रजनन करतात; मत्स्यपालन आणि मत्स्यशेतीमधील लोकांसाठी उत्पन्नाचा एक प्रमुख स्रोत असतात. सरोवराच्या आसपासचे पर्यटन हे एक अतिशय फायदेशीर क्षेत्र आहे. भारतामध्ये, नैसर्गिक जलाशयांभोवती शहरी आणि ग्रामीण तलाव आहेत, ज्यांचे दलदलीच्या प्रदेशांवरील रामसर अधिवेशनात (1971) वर्गीकरण करण्यात आले आहे आणि परिस्थितीक उपजिविका आणि अनेक लोकांसाठी निर्वाहाचे साधन म्हणून महत्वाचे आहेत (आरघायम, 2009).

### 1.7.1.2 ओढे आणि नद्या

हे एकाच दिशेने वाहणाऱ्या पाण्याचे प्रवाह असतात. ओढे आणि नद्या सर्वत्र आढळतात – त्यांचा प्रारंभ एका मोठ्या प्रवाहापासून होतो, जे झरे, वितळलेले बर्फ किंवा अगदी तलाव सुध्दा असतात आणि मग ते त्यांच्या मुखापर्यंत वाहात येतात, सहसा पाण्याच्या दुसऱ्या मार्गापर्यंत किंवा समुद्रापर्यंत. स्त्रोतापासून मुखापर्यंतच्या प्रवासात नद्या किंवा ओढ्यांची वैशिष्ट्ये बदलतात. स्त्रोतापाशीचे तापमान हे मुखापेक्षा थंड असते. पाणी सुध्दा जास्त स्वच्छ असते, ऑक्सिजनच्या पातळ्या उच्च असतात आणि तिथे ट्राउट आणि हेटेरोट्रोफ्ससारखे ताज्या पाण्याचे मासेही आढळतात. ओढा/नदीच्या मध्यापर्यंत आल्यावर त्याची रुंदी वाढते, तसेच त्यातील प्रजाती वैविध्यही वाढते – असंख्य जलीय हिरव्या वनस्पती आणि शेवाळ तिथे आढळू शकते. ओढा/नदीच्या मुखापर्यंत आल्यावर प्रवाहाबरोबर वाहात आलेल्या गाळाने पाणी गढूळ होत जाते आणि त्यामुळे पाण्यातून झिरपणारा प्रकाश कमी होतो. प्रकाश कमी असल्यामुळे, तिथे वनस्पती वैविध्य कमी असते आणि ऑक्सिजनच्या पातळ्या कमी झाल्यामुळे कॅट फिश आणि कतलासारखे कमी ऑक्सिजन लागणारे मासे इथे आढळतात.

भारताची नदी प्रणाली मोठी आणि भरपूर पाणी असणारी आहे. बारा प्रमुख नद्या आणि अनेक लहान नद्या आणि ओढे आढळतात. सात प्रमुख नद्यांमुळे भारताची नदी प्रणाली बनते. गंगा–ब्रम्हपुत्रा आणि सिंधू प्रणाली ह्या सर्वात मोठ्या आहेत कारण त्या देशातील जवळजवळ अर्धे अर्थात वापरता येणाऱ्या पृष्ठभागावरील पाण्यापैकी 40 टक्के पाणी वाहून नेतात. भारतातील सर्व प्रमुख नद्यांचा उगम हा तीन प्रमुख पाणलोट क्षेत्रांतून होतो – अ) हिमालय आणि काराकोरमच्या पर्वतरांगा, ब) मध्य भारतातील विंध्य आणि सातपुडा पर्वतराजी आणि छोटानागपूर पठार आणि क) पश्चिम भारतातील सह्याद्री किंवा पश्चिम घाट. भारतातील 70 टक्क्यांपेक्षा पेक्षा जास्त नद्या बंगालच्या उपसागरात जाऊन पोहोचतात, बहुतांश गंगा–ब्रम्हपुत्रा प्रणालीचा भाग बनून. सिंधू आणि इतर नद्यांतून येणाऱ्या निचऱ्यापैकी 20 टक्के अरबी समुद्रात होतो. बाकीचा 10 टक्के अंतर्गत खोरी आणि नैसर्गिक तलावांमध्ये होतो (NIH, 2015, भारत-WRIS Wiki 2014 आणि आरघायम, 2009).

10% drains into interior basins and natural lakes (NIH, 2015, India-WRIS Wiki 2014 and Arghyam, 2009).

### 1.7.1.3 Wetlands

Wetlands are areas of standing water that support aquatic plants. Marshes, swamps, and bogs are all considered wetlands. Plant species adapted to the very moist and humid conditions are called hydrophytes. These include pond lilies, cattails, sedges, tamarack, and black spruce. Marsh flora also include such species as cypress and gum.

Wetlands have the highest species diversity of all ecosystems. Many species of amphibians, reptiles, birds (such as ducks and waders), and furbearers can be found in the wetlands. Wetlands are not considered freshwater ecosystems as there are some, such as salt marshes, that have high salt concentrations—these support different species of animals, such as shrimp, shellfish, and various grasses.

India, with its annual rainfal1 of over 130 cm, varied topography and climatic regimes, supports and sustains diverse and unique wetland habitats. Natural wetlands in India consists of the high-altitude Himalayan lakes, followed by wetlands situated in the flood plains of the major river systems, saline and temporary wetlands of the arid and semi-arid regions, coastal wetlands such as lagoons, backwaters and estuaries, mangrove swamps, coral reefs and marine wetlands, and so on. In fact with the exception of bogs, fens and typical salt marshes, Wetlands in India occupy 58.2 million ha, including areas under wet paddy cultivation (Directory of Indian Wetlands) Prasad et al., 2004

Fig 1: [illegible]




[illegible]

### 1.7.1.3 दलदलीचे प्रदेश

दलदलीचे प्रदेश म्हणजे जिथे साचलेले पाणी असते जे जलीय वनस्पतींना उपयोगी पडते. दलदली, पाणथळ जमिनी यांना दलदलीचे प्रदेश समजले जाते. ज्या वनस्पती प्रजाती अतिशय आर्द्र आणि दमट परिस्थितींमध्य वाढतात त्यांना जलचर म्हणतात. यामध्ये पॉंड लिलि, कॅटटेल्स, सेजेस, टॅमारॅक आणि ब्लॅक स्प्रुसचा समावेश होतो. दलदलीतील वनस्पतींमध्ये सुरू व डिंक या प्रजातींचाही समावेश होतो.

दलदलीच्या प्रदेशांमध्ये सर्व परिस्थितीक व्यवस्थेतील सर्वाधिक प्रजाती वैविध्य असते. उभयचर, सरपटणारे प्राणी, पक्षी (जसे की बदके आणि वॅडर्स) आणि केसाळ प्राण्यांच्या अनेक प्रजाती दलदलीच्या प्रदेशात आढळतात. दलदलीच्या प्रदेशांना ताज्या पाण्याची परिस्थितीक व्यवस्था मानले जात नाही, कारण मिठाच्या दलदलींसारखे काही आहेत, ज्यांमध्ये मिठाचे जास्त केंद्रीकरण असते – हे प्राण्यांच्या भिन्न प्रजातींना सहयोग करते, जसे की श्रिम्प, शेलफिश आणि विविध प्रकारचे गवत.

130 सेमी पेक्षा अधिक वार्षिक पर्जन्यमान, वैविध्यपूर्ण भौगोलिक परिस्थिती आणि हवामानाची ऋतुमान पध्दती भारतामध्ये वैशिष्ट्यपूर्ण दलदलीचा प्रदेशाच्या वस्त्यांना सहाय्य करतात आणि टिकवून ठेवतात. भारतातील नैसर्गिक दलदलीच्या प्रदेशांमध्ये समुद्र सपाटीपासून अती उच्च ठिकाणची हिमालयातील सरोवरे, प्रमुख नद्यांच्या प्रणालींच्या पुराच्या पठारावर असलेले दलदलीचे प्रदेश, क्षारयुक्त आणि रुक्ष आणि अर्ध–रखरखीत प्रदेशातील तात्पुरते दलदलीचे प्रदेश, खाऱ्या पाण्याची सरोवरे, बॅकवॉटर्स आणि नदी मुखे, खारफुटीच्या पाणथळीच्या जमिनी, प्रवाळ बेटे आणि समुद्री दलदलीचे प्रदेश यांसारखे किनाऱ्यावरील दलदलीच्या प्रदेश यांचा समावेश होतो. खरे तर दलदलीच्या, पाणथळ जागा आणि नेहमीच्या मिठाच्या दलदलींचा अपवाद वगळता, भारतातील दलदलीचे प्रदेश भाताच्या लागवडीखालील क्षेत्रासह 58.2 दशलक्ष हे. क्षेत्रफळ व्यापतात (डायरेक्टरी ऑफ इंडियन वेटलॅंड्स) प्रसाद एट अल, 2004

आकृती 1: भारतातील दलदलीच्या प्रदेशांचे वर्गीकरण




स्त्रोतः NCSCM रिपोर्ट/ SAC, 2011. नॅशनल वेटलॅन्ड ॲटलस-SAC/EPSA/ABHG/NWIA/ATLAS/34/2011, स्पेस ॲप्लिकेशन्स सेंटर (ISRO) अहमदाबाद, भारत, पृष्ठ 310.




Gosabara wetland area is located in Porbandar district in the Saurashtra region of Gujarat, which covers an area of 2,316 km² with a total human population of 5,86,060 people. The three talukas in the district comprises a total of 182 villages, and three talukas in the district. Porbandar district has been carved out from Junagadh district. The Arabian Sea in the west, Devbhumi-Dwarka district in north, Jamnagar in the east and Junagadh in south form the boundaries of Porbandar district.

Gosabara is a unique mosaic wetland ecosystem harbouring 112 species of resident and migratory bird.

It is a natural lagoon modified by construction of large check dam to control intrusion of sea water. During high tide, sea water enters in a part of the lagoon making it a unique habitat of saline and freshwater mosaic. Large and shallow spread of water in the wetland attracts large number and variety of migratory birds including some globally threatened species such as the Greater Spotted Eagle, Dalmatian Pelican and Peregrine Falcon, making it a wetland of International Importance.

Gosabara hosts more than 1 lakh birds of 112 species belonging to 17 families, indicating the excellent ecological health of this wetland ecosystem. The Lesser Flamingo has the largest population at Gosabara. The Northern Pintail is the most dominant among ducks. Two species of cranes are found here—Common Crane and Demoiselle Crane. The Black-tailed Godwit is dominant among the shore birds. A record 27 Mallards have been counted in Gosabara.

There are two waders that breed in Gosa Bara—the Collared Pratincole and Kentis Plover. The first one is called 'Mota Tejpar' and the latter 'Dhongili'. Both are ground nesting birds. Other shore birds include the Black-tailed Godwit, Spotted Redshank, Common Redshank, Golden Plover, Marsh Sandpiper, Curlew Sandpiper and Wood Sandpiper.

The area qualifies as a potential Ramsar Site from Gujarat according to a SACON (MoEFCC) report.




गोसाबारा पाणथळ क्षेत्र गुजरातच्या सौराष्ट्र प्रदेशातील पोरबंदर जिल्ह्यात आहे, जे एकूण 5,86,060 स्थानिक मानवी लोकसंख्येसह 2,316 वर्ग किमी इतके क्षेत्र समाविष्ट करते. राज्यातील तीन तालुके एकूण 182 गावांचे बनले आहेत. जुनागड जिल्ह्यातून पोरबंदर जिल्हा वेगळा काढण्यात आला आहे. पश्चिमेला अरबी समुद्र, उत्तरेला देवभूमी–द्वारका राज्य, पूर्वेला जामनगर आणि दक्षिणेला जुनागड अशा पोरबंदर जिल्ह्याच्या सीमा आहेत.

गोसाबारा ही एक वैशिष्ट्यपूर्ण मोझॅक पाणथळी परिस्थितीक व्यवस्था आहे ज्यामध्ये निवासी व स्थलांतरीत पक्षांच्या 112 प्रजाती राहतात.

हे एक नैसर्गिक खाऱ्या पाण्याचे सरोवर आहे ज्यावर मोठे धरण बांधून समुद्राचे पाणी आत घुसण्यावर नियंत्रण केले आहे. मोठ्या भरतीच्या वेळी, पाणी खाऱ्या पाण्याच्या सरोवरात घुसते ज्यामुळे ते क्षारयुक्त आणि ताज्या पाण्याच्या मोझॅकची एक वैशिष्ट्यपूर्ण वस्त्या बनते. पाणथळीच्या प्रदेशातील विस्तृत आणि उथळ पसरलेले पाणी अनेक स्थलांतरित पक्षांना आकर्षित करते ज्यामध्ये जागतिक स्तरावर धोका असलेल्या प्रजातींचाही समावेश होतो जसे की ग्रेटर स्पॉटेड ईगल, डॅल्मेशिअन पेलिकन आणि पेरेग्राइन फाल्कन, ज्यामुळे पाणथळीला आंतरराष्ट्रीय महत्व येते.

17 कुटुंबांतील 112 प्रजातींच्या 1 लाख पक्षांचे गोसाबारा यजमानपद भूषवते, ज्यातून ह्या पाणथळी परिस्थितीक व्यवस्थेचे उत्कृष्ठ परिस्थितीक आरोग्य सूचित होते. लेसर फ्लेमिंगोंची गोसाबारामध्ये सर्वात जास्त लोकसंख्या आहे. बदकांमध्ये उत्तरी पिनटेलचे सर्वाधिक वर्चस्व आहे. क्रेनच्या (करकोचा) दोन प्रजाती येथे आढळतात – सामान्य क्रेन आणि डोमिसेले क्रेन. किनाऱ्यावरील पक्षांमध्ये ब्लॅक टेल गोडविट प्रबळ आहे. गोसाबारामध्ये 27 मालार्ड नोंदवले गेले आहेत.

गोसाबारामध्ये दोन वॅडर्स जन्म घेतात – कोलार्ड प्रॅटिनकोल आणि केन्टिस प्लोवर. पहिल्याला 'मोटा तेजपर' आणि दुसऱ्याला 'ढोंगिलि' म्हणतात. दोघेही जमिनीवर घरटी करणारे पक्षी आहेत. किनाऱ्यावरील इतर पक्ष्यांमध्ये ब्लॅक टेल गोडविट, स्पॉटेड रेडशँक, कॉमन रेडशँक, गोल्डन प्लोवर, मार्श सँडपायपर, कर्ल्यू सँडपायपर आणि वुड सँडपायपरचा समावेश होतो.

SACON (MoEFCC) अहवालानुसार हा प्रदेश संभाव्य रामसर साईटसाठी पात्र आहे.


ચાંદની

impacts include increased flood risk, coastal erosion and inland retreat, saline intrusion and storm surges. In addition, direct human interventions by river damming; agricultural and coastal development; cutting off freshwater supplies to creeks lined with mangroves; direct felling; and dumping of wastes that choke waterways etc are other important threats.

Indian mangrove vegetation covers about 6,749 km2 . The entire mangrove habitats are situated in three zones: (1) East Coast, about 4700km2 , (2) West Coast, about 850 km2 , and (3) Andaman and Nicobar Islands about 1190 km2 These zones have been further categorized into Deltaic, Coastal, and Island habitats. It is estimated that worldwide 48 to 90 species of mangroves exist, India with rich mangrove species diversity inhabits 82 species of mangroves are present in India Areas under mangrove vegetation (sq.km) mapped in different scales using satellite data (Table 1) shows that West Bengal has highest mangrove cover of 1838.4 sq.km followed by Gujarat 1012.9 sq.km (Marale & Mishra 2011).

The Sundarbans is the largest single block of tidal halophytic mangrove forest in the world with ~60 per cent located in Bangladesh and the rest (~40%) in India. It is a UNESCO World Heritage Site. The Sundarbans are situated between the latitudes 22º15' and 21º30' North and 88º10' and 89º51' East. The total area of Sundarbans in India is 4,262 sq km. India is home to some of the best mangroves in the world. West Bengal has the maximum mangrove cover in the country followed by Gujarat and the Andaman and Nicobar Islands. The Ministry of Environment and Forests (MoEF) has established a National Mangrove Genetic Resources Centre in Orissa. Mangrove vegetation has been reported in all the 13 coastal states/union territories.

Mangroves provide a variety of benefits. They are a source of firewood, wood products such as timber and posts; non-wood produce such as fodder, honey, wax, tannin, dyes; and plant materials for thatching. Mangrove wetlands and forests can act as a shelter belt against cyclones, and even tsunamis. In Orissa state, villages surrounded by mangrove forests survived the fury of the super cyclone in 1999, unlike other villages; similarly villages in Cuddalore and Nagapattinam districts of Tamil Nadu that were buffered by mangroves suffered relatively less damage in the 2004 Indian Ocean tsunami. They also prevent coastal erosion. The most important role of mangroves is the relative quiet conditions they provide which serve as nursery grounds for a number of commercially important fish, prawn, crabs and molluscs. The mangrove food web is complex and enhances the fishery production of nearby coastal waters by exporting nutrients and detritus. They also provide habitats for wildlife ranging from migratory birds to estuarine crocodiles (e.g. Bhitarkanika National Park), tigers (Sunderbans), etc

Mangroves are restricted to the intertidal zone along the coasts and are becoming increasingly depleted due to anthropogenic pressures. They are also extremely vulnerable to the effects of climate change, such as rising sea levels, resulting in loss of habitat and changes in salinity, changes in precipitation and wave climates and an increase in the frequency of natural disasters. The 6,000 sq km of mangrove forest along the coast of India and Bangladesh is the largest such forest in the world.

As a result of rising sea levels, 7,500 ha of mangroves in this tract along the shores of the two countries are lost due to inundation (http.www//assets.panda.org/downloads/wwfparksbro.pdf). Mangrove forests are home to a number of species such as the critically endangered tiger, the Eurasian otter, five species of marine turtles and the estuarine crocodile and large numbers of crustaceans and fishes. With a 1 m rise in the sea level, the Sundarbans are likely to disappear, which may result in the extinction of the tiger, as well as the other species in these habitats (Smith et al 1998). [ Savarkar 2014, ENVIS publication]

खारफुटीला वाढत्या हवामान व वाढत्या मानवजन्य दबावांस तोंड द्यावे लागते. समुद्राच्या पातळीमध्ये होणारी वाढ हा सर्वात मोठा धोका आहे आणि त्याच्याशी निगडीत सामाजिक–आर्थिक प्रभावांमध्ये पुराची वाढती जोखीम, किनाऱ्यावरील धूप आणि जमीन मागे जाणे, वाढणारे क्षार आणि उसळती वादळे यांचा समावेश होतो. ह्याशिवाय, नदीवर बंधारा बांधणे, कृषी आणि किनारी विकास, खारफुटीने वेढलेल्या खाड्यांना ताज्या पाण्याचा होणारा पुरवठा तुटणे, कचरा थेट पडणे आणि आणून टाकणे यांसारख्या गोष्टींमुळे पाण्याचे मार्ग बंद होणे इ. इतर महत्वाचे धोके आहेत.

भारतीय खारफुटीच्या वस्त्या सुमारे 6,749 वर्ग किमी वर पसरलेल्या आहेत. संपूर्ण खारफुटीच्या वस्त्या तीन क्षेत्रांमध्ये स्थित आहेतः (1) पूर्व किनारपट्टी, सुमारे 4700 वर्ग किमी, (2) पश्चिम किनारपट्टी, सुमारे 850 वर्ग किमी आणि (3) अंदमान आणि निकोबार बेटे सुमारे 1190 वर्ग किमी ह्या क्षेत्रांचे पुढे डेल्टाईक (नदीच्या मुखाजवळील त्रिभुज प्रदेश), किनारी, आणि बेटावरील वस्त्या असे वर्गीकरण करण्यात आले आहे. जगभरामध्ये 48 ते 90 खारफुटीच्या प्रजाती अस्तित्वात आहेत असा अंदाज बांधला जातो, समृध्द खारफुटी प्रजाती वैविध्य असलेल्या भारतामध्ये खारफुटीच्या 82 प्रजाती सध्या आहेत. सॅटेलाईट डेटा वापरून केलेल्या (तक्ता1) विविध मापनानुसार भारतामध्ये खारफुटीचे वस्त्या असलेले क्षेत्र दर्शवते की पश्चिम बंगालमध्ये 1838.4 वर्ग किमी. इतकी सर्वाधिक खारफुटी आहे त्या पाठोपाठ गुजरातमध्ये 1012.9 वर्ग किमी. आहे (मारळे आणि मिश्रा 2011).

सुंदरबन हा जगातील सर्वात मोठा टायडल हॅलोफीटिक खारफुटी जंगलाचा एकेरी ब्लॉक आहे, जो बांग्लादेशमध्ये 60 टक्के आणि बाकीचा भारतामध्ये आहे (40 टक्के ). ती युनेस्कोची जागतिक वारसा साईट आहे. सुंदरबन उत्तरेला 22º15 आणि 21º30 आणि पूर्वेला 88º10 आणि 89º51 अक्षांशांच्या मध्ये स्थित आहे.भारतामध्ये सुंदरबनचे एकूण क्षेत्र 4,262 वर्ग किमी. असून जगातील काही सर्वोत्तम खारफुटीचे ते घर आहे. पश्चिम बंगालमध्ये देशातील सर्वाधिक खारफुटीचे आच्छादन आहे त्या पाठोपाठ गुजरात आणि अंदमान व निकोबार बेटांवर. पर्यावरण व वन मंत्रालयाने (MoEF) ओरिसामध्ये एक राष्ट्रीय खारफुटी जनुकीय साधनस्त्रोत केंद्र प्रस्थापित केले आहे. सर्व 13राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमध्ये खारफुटीचे वस्त्या नोंदवले गेले आहेत.

खारफुटीमुळे विविध लाभ मिळतात. जळाऊ लाकूड, लाकडाची उत्पादने जसे की लाकूड आणि खांब, चारा, मध, मेण, टॅनिन, रंग यांसारखी लाकडा व्यतिरिक्तची उत्पादने; आणि शाकारणीसाठी वनस्पती साहित्यांची ती स्त्रोत आहेत. खारफुटीचे दलदलीचे प्रदेश आणि जंगले ही चक्रीवादळांपासून आणि अगदी त्सुनामींपासूनही आसऱ्याचे काम करू शकतात. ओरिसा राज्यात, 1999 मध्ये आलेल्या भयंकर चक्रीवादळातून अशीच गावे वाचली जी खारफुटीच्या जंगलांनी वेढलेली होती. त्याचप्रमाणे तामिळनाडूतील कुड्डालोर आणि नागापट्टणम राज्यांतील ज्या गावांना खारफुटीचे उभयरोधन होते त्यांना 2004 मध्ये आलेल्या हिंदी महासागरातील त्सुनामीचा फटका तुलनेने कमी बसला. ती किनाऱ्याची धूप होण्यास प्रतिबंधही करतात. खारफुटीची सर्वात महत्वाची भूमिका म्हणजे त्यांच्यामुळे मिळणारी तुलनेने शांत अवस्था जी व्यावसायिकरित्या महत्वाच्या असलेल्या अनेक मासे, कोळंबी, खेकडे आणि मृदूकाय प्राण्यांसाठी एक नर्सरी ग्राउंड बनवतात. खारफुटीच्या अन्नाचे जाळे गुंतागुंतीची असते आणि पोषक तत्वे आणि वाहून आणलेला दगडाचा चुरा निर्यात करून आसपासच्या किनारी पाण्यांतील मत्स्योत्पादन वाढवते. अगदी स्थलांतरित पक्षांपासून ते एश्चअराईन मगरी (उदा. भिटारकनिका राष्ट्रीय उद्यान), वाघ (सुंदरबन), इ. पर्यंत. ती विस्तृत वन्यजीवनासाठी वस्तीही प्रदान करतात

खारफुटी फक्त भरती–ओहोटीच्या मधील क्षेत्रात किनारपट्टीला लागून मर्यादित क्षेत्रातच असते आणि मानवजन्य दबावांमुळे मोठ्या प्रमाणावर नष्ट होत आहे. हवामान बदलालाही त्या अतिशय भेद्य असतात जसे की समुद्राच्या वाढत्या पातळ्या, ज्यामुळे वस्त्या नष्ट होतात आणि क्षाराच्या प्रमाणात बदल घडतो, पर्जन्य आणि लाटांचे हवामान बदलते आणि नैसर्गिक आपत्तींमध्ये वाढ होते. भारत आणि बांग्लादेशच्या किनारपट्टीला लागून असलेले 6,000 वर्ग किमीचे खारफुटीचे जंगल जगातील सर्वात मोठे अशा प्रकारचे जंगल आहे.

समुद्राच्या वाढत्या पातळ्यांमुळे दोन्ही देशांच्या किनारपट्टी लगतच्या ह्या मार्गातील 7,500 हेक्टर खारफुटी प्रलयामुळे गमावली गेली आहे (http.www//assets.panda.org/downloads/wwfparksbro.pdf). खारफुटीची जंगले ही अनेक प्रकारच्या प्रजातींचे निवासस्थान आहेत जसे की गंभीररित्या धोक्यात असलेले वाघ, युरेशिअन पाणमांजर, समुद्री कासवांच्या पाच प्रजाती आणि एश्चअराईन मगर तसेच मोठ्या प्रमाणावर कवची अपृष्ठवंशीय आणि मासे. समुद्राच्या पातळीमध्ये 1 मी वाढ झाल्यास सुंदरबन लोप पावतील, ज्यामुळे वाघ आणि ह्या वस्त्यांमधील इतर प्रजातींचे विलोपन होईल (स्मिथ एट अल 1998). (सावरकर 2014, एनव्हिस प्रकाशन)

## 1.7.2.2 Tidal mudflats

The Indian coastline has extensive mud flats covering an area of more than 38,000 km2 . Most of the larger river mouths are concentrated in the northeast and northwest coastal areas and hence the muddy coasts of India are mainly located in these areas. India's non-vegetated mud flats have a total area of about 22300 km2 , 90% of which are located in the state of Gujarat in the north-west of the country [16]. The vegetated category is also in large part situated in this area i.e. 4353 km2 out of a total of about 5073 km2 (Marale & Mishra 2011).

## 1.7.1.3 Lagoons

A lagoon is a shallow water body along the low lying coast separated from the ocean by a barrier but also connected to the ocean by one or a few restricted inlets. There are 8 major lagoons on the East Coast and 9 on the West Coast. Major lagoons on the East Coast are 1. Bende, 2. Chilka, 3. Gulf of Mannar, 4. Muthupet, 5. Muthukadu, 6. Nizampatnam, 7. Pennar and 8. Pulicat. Lagoons on the West Coast are 1. Asthamudi, 2. Ettikulum, 3. Lagoons of Bombay Coast, 4. Lagoons of Lakshadweep atolls, 5. Paravur, 6. Murukumpuzha, 7. Talapady, 8. Veli and 9. Vembanad. Lagoon ecosystems are also getting adversely affected by the urbanization, industrialization and aquaculture activities in the same ways as estuarine ecosystems (Saxena, 2012).

**Lagoons:**

**Lagoons are shallow water bodies separated from larger water bodies by barrier islands or reefs. They usually form on gently sloping coasts where barrier islands can form off the coast and are generally shallow. Lagoons include coastal and atoll lagoons.**

**Some examples of lagoons in India are Chilika in Odisha, Pulicat in Tamil Nadu, Vembanad Lake in Kerala and atoll lagoons of Lakshadweep.**

## 1.7.2.4 Estuaries

Estuaries mark the transitional zone between the lower tidal region of a river and the marine environment. Estuaries are areas where freshwater streams or rivers merge with the ocean. This mixing of waters with such different salt concentrations creates a very interesting and unique ecosystem. Microflora like algae, and macroflora, such as seaweeds, marsh grasses, and man-grove trees (only in the tropics), can be found here. Estuaries support a diverse fauna, including a variety of worms, oysters, crabs and waterfowl.

Oceans and major seas cover 70.8 per cent or 362 million sq km of the earth, with a global coast-line of 1.6 million km. Coastal and marine ecosystems are found in 123 countries around the world. Marine ecosystems are strongly connected through a network of surface and deep-water currents, and they are among the most productive eco- systems in the world. Coastal and marine ecosystems include sand dune areas, where freshwater and seawater mix, near-shore coastal areas and open-ocean marine areas. Marine systems extend from the low-water mark, i.e. 50 m depth, to the high seas, and coastal systems stretch from the coastline to depths less than 50 m.

They are sheltered coastal water bodies which act as nutrient traps, shelter and nursery for a wide variety of marine life forms. They are very important from commercial, industrial and recre-ational point of view. There are 14 major estuaries on the East Coast and 16 on the West Coast. Major East Coast estuaries are Adyar, Agniyar, Corum, Edaiyur, Ennire, Godavari, Hoogly, Kallar, Kavery, Kollidam, Krishna, Rushikulya, Uppanar and Vellar. The major West Coast estuaries are Asthamudi, Amba, Beypore, Gangolli, Kali, Kaninamkulam, Korapuzha, Madovi, Mahi, Mahim, Netravathi and Gurupur, Pavenje, Periyaar, Vembanad and Zurai. The total estimated area under the estuaries in India is approximately 2 million ha (Qasim & Sengupta, 1984). The estuarine eco-systems are under heavy anthropogenic pressures mainly due to urbanization and industrializa-tion. Dumping of sewage, inflow of municipal waste water and industrial effluents into these water



## 1.7.2.2 टायडल मडफ्लॅट्स

भारतीय किनारपट्टीवर व्यापक मड फ्लॅट्स आहेत जे 38,000 वर्ग किमी पेक्षा जास्त क्षेत्र समाविष्ट करतात. नदीची बहुतांश मोठी मुखे ही उत्तरपूर्व आणि उत्तरपश्चिम किनारी क्षेत्रांमध्ये केंद्रित आहेत त्यामुळे भारताची दलदलयुक्त किनारपट्टी जास्त करून ह्या भागांमध्ये स्थित आहे. वनस्पती नसलेल्या भारताच्या दलदलीच्या प्रदेशांचे एकूण क्षेत्रफळ साधारण 22,300 वर्ग किमी आहे, ज्यांपैकी 90 टक्के क्षेत्र देशाच्या उत्तर– पश्चिम भागामध्ये गुजरात राज्यात आहे (16). वनस्पती असलेली श्रेणी सुध्दा ह्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर स्थित आहे. म्हणजेच, एकूण 5073 वर्ग किमी पैकी 4353 वर्ग किमी (मारळे आणि मिश्रा 2011).

## 1.7.2.3 खारकच्छ

खारकच्छ म्हणजे अडथळ्याने समुद्रापासून स्वतंत्र झालेल्या परंतु एक किंवा जास्त निर्बंधित लहान खाड्यांनी खालच्या पातळीवरील किनारपट्टीला लागून असलेला उथळ जलाशय. पूर्व किनारपट्टीवर 8 प्रमुख खाऱ्या पाण्याची सरोवरे आहेत आणि पश्चिम किनारपट्टीवर 9 आहेत. पूर्व किनारपट्टीवर प्रमुख खारकच्छ आहेत 1. बेंडे, 2. चिल्का, 3. मन्नारचे आखात, 4. मुथुपेट, 5. मुथुकाडू, 6.निजामापटनम, 7. पेन्नार आणि 8. पुलिकत. पश्चिम किनारपट्टीवर प्रमुख खारकच्छ आहेत 1. अस्थामुडी, 2. एथिकुलम, 3. मुंबईच्या किनारपट्टीवरील खाऱ्या पाण्याची सरोवरे, 4. लक्षद्विप बेटांची खाऱ्या पाण्याची सरोवरे, 5. पारावुर, 6. मुरुकुम्पुझा, 7. तालापाडी, 8. वेली आणि 9. वेम्बनाड. खाऱ्या पाण्याच्या सरोवरांच्या परिस्थितीक व्यवस्थेवरही शहरीकरण, औद्योगीकरण आणि जलजीवन उपक्रमांचा परिणाम होत आहे ज्याप्रमाणे एश्चअराईन परिस्थितीक व्यवस्थेने होतो तसाच (सक्सेना, 2012).

**खारकच्छः**

**खारकच्छ म्हणजे अडथळा निर्माण करणाऱ्या बेट किंवा खाडीने मोठ्या जलाशयापासून स्वतंत्र झालेले जलाशय. ती सहसा हळुवारपणे उतार निर्माण करणाऱ्या किनाऱ्यावर तयार होतात जिथे अडथळा निर्माण करणारी बेटे किनाऱ्यापासून दूर तयार होतात आणि सहसा उथळ असतात. खारकच्छमध्ये किनारी आणि बेटावरील खाऱ्या पाण्याच्या सरोवरांचा समावेश होतो.**

**भारतातील काही खारकच्छची उदाहरणे आहेत ओरिसातील चिलिका, तामीळनाडूतील पुलिकत, केरळमधील वेम्बानंद लेक आणि लक्षद्विप बेटांवरील खारकच्छ.**

## 1.7.2.4 नदी मुखे

नदीचा ओहोटीचा प्रदेश आणि समुद्री पर्यावरणादरम्यानचे संक्रमण क्षेत्र म्हणजे नदी मुखे. नदी मुखे म्हणजे असे भाग जिथे ताज्या पाण्याचे ओढे किंवा नद्या महासागरात विलीन होतात. अशा भिन्न क्षार एकीकरणाचे पाणी मिसळल्यामुळे एक अतिशय मनोरंजक आणि वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीक व्यवस्था तयार होते. शेवाळसारखे मायक्रोफ्लोरा आणि समुद्रीशैवाल, दलदलीतील गवते आणि खारफुटीतील झाडे (केवळ उष्ण कटिबंधात) यासांरखे मायोक्रोफ्लोरा येथे आढळतात. नदी मुखे वैविध्यपूर्ण जीवांना आधार देतात, ज्यामध्ये विविध प्रकारचे जंतू, शिंपले, खेकडे आणि पाणकोंबड्याचा समावेश होतो.

महासागर आणि मुख्य समुद्र 70.8 टक्के किंवा 362 दशलक्ष वर्ग किमी पृथ्वी सामावून घेतात, ज्यामध्ये 1.6 दशलक्ष किमी.च्या सागरी किनारपट्टीचा समावेश होतो. किनारी आणि समुद्री परिस्थितीक व्यवस्था जगभरामध्ये 123 देशांमध्ये आढळतात. समुद्री परिस्थितीक व्यवस्था पृष्ठभाग आणि खोल–पाण्याच्या प्रवाहांनी बळकटपणे जोडलेल्या असतात आणि त्या जगातील सर्वात उत्पादक परिस्थितीक व्यवस्था आहेत.

किनारी आणि समुद्री परिस्थितीक व्यवस्थांमध्ये वाळूच्या टेकड्यांचा समावेश होतो, जिथे ताजे पाणी आणि समुद्राचे पाणी किनारी क्षेत्रांमध्ये आणि खुल्या–महासागर समुद्री क्षेत्रांमध्ये मिसळते. समुद्री प्रणाली खालच्या वॉटर मार्कपासून वाढत जातात, अर्थात 50 मी खोलीपासून ते उच्च समुद्रांपर्यंत आणि किनारी प्रणाली किनारपट्टीवरून 50 मी. हून कमी खोलीपर्यंत पसरते. ते निवारा असलेले किनारी जलाशय असतात जे पोषक घटकांचे सापळे, विविध प्रकारच्या समुद्री सजीवांसाठी निवारा आणि नर्सरीचे काम करतात. व्यावसायिक, औद्योगिक आणि मनोरंजनाच्या दृष्टीकोनातून ते अतिशय महत्वाचे आहेत. पूर्व किनारपट्टीवर 14 प्रमुख नदीमुखे आहेत आणि पश्चिम किनारपट्टीवर 16 आहेत. पूर्व किनारपट्टीवरील प्रमुख नदी मुखे आहेत अड्यार, अग्नियार, कोरम इडैयुर, एन्निरे, गोदावरी, हुगळी, कल्लार, कावेरी, कोल्लिडम, कृष्णा, ऋषीकुल्य, उप्पानार आणि वेल्लार. पश्चिम किनारवरील प्रमुख नदी मुखे आहेत अस्थामुडी, अंबा, बेपोर, काली, कानिनामकुलम, कोरापुझा, माडोवी, माही,

bodies are causing extensive damage to these ecosystems. The aquaculture activities around estuaries have also resulted in heavy accumulation of heavy organic and inorganic pollutants. (Saxena, 2012).

## Marine

Marine regions cover about three-fourths of the earth's surface and include oceans, coral reefs, and estuaries. Marine algae supply much of the world's oxygen supply and take in a huge amount of atmospheric carbon dioxide. Evaporation of seawater provides rainwater for the land.

### 1.7.2.5 Oceans

The largest of all the ecosystems, oceans are very large bodies of water that dominate the earth's surface. Like ponds and lakes, ocean regions are separated into separate zones: intertidal, pelagic, abyssal, and benthic. All four zones have a great diversity of species. Some say that the ocean contains the richest diversity of species even though it contains fewer species than there are on land.

The intertidal zone is where the ocean meets the land—sometimes it is submerged and at other times exposed, as waves and tides come in and out. Because of this, the communities are constantly changing. On rocky coasts, the zone is stratified vertically. Where only the highest tides reach, there are only a few species of algae and mollusks. In these areas usually submerged during high tide, there is a more diverse array of algae and small species, such as herbivorous snails, crabs, sea stars and small fishes. At the bottom of the intertidal zone, which is only exposed during the lowest tides, many invertebrates, fishes and seaweed can be found. The intertidal zone on sandier shores is not as stratified as in the rocky areas. Waves keep mud and sand constantly moving, thus very few algae and plants can establish themselves—the fauna include worms, clams, predatory crustaceans, crabs and shorebirds.

The pelagic zone includes those waters further from the land, basically the open ocean. The pelagic zone is generally cold though it is hard to give a general temperature range since, just like ponds and lakes, there is thermal stratification with a constant mixing of warm and cold ocean currents. The flora in the pelagic zone include surface seaweeds. The fauna include many species of fish and some mammals, such as whales and dolphins. Many feed on the abundant plankton.

The benthic zone is the area below the pelagic zone, but does not include the very deepest parts of the ocean (see abyssal zone below). The bottom of the zone consists of sand, silt, and/or dead organisms. Here temperature decreases as depth increases toward the abyssal zone, since light cannot penetrate through the deeper water. Flora are represented primarily by seaweed while the fauna, since it is very nutrient-rich, include all sorts of bacteria, fungi, sponges, sea anemones, worms, sea stars and fishes.

The deep ocean is the abyssal zone. The water in this region is very cold (around 3° C), highly pressured, high in oxygen content, but low in nutritional content. The abyssal zone supports many species of invertebrates and fishes. Mid-ocean ridges (spreading zones between tectonic plates), often with hydrothermal vents, are found in the abyssal zones along the ocean floors. Chemosynthetic bacteria thrive near these vents because of the large amounts of hydrogen sulfide and other minerals they emit. These bacteria are thus the start of the food web as they are eaten by invertebrates and fishes.

माहिम, नेत्रावथी आणि गुरुपुर, पावंजे, पेरियार, वेम्बानाद आणि झुआरी. भारतातील नदी मुखांतर्गत असलेले एकूण अंदाजे क्षेत्र 2 दशलक्ष हेक्टर आहे (कासिम आणि सेनगुप्ता, 1984). एश्चुअराईन परिस्थितीक व्यवस्थेवर प्रामुख्याने शहरीकरण आणि औद्योगीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर मानवजन्य दबाव आहे. ह्या जलाशयांमध्ये सांडपाणी, नगरपालिकेचे घाण पाणी आणि औद्योगिक निस्सरण सोडण्यामुळे ह्या परिस्थितीक व्यवस्थेस मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. नदी मुखांभोवतीच्या जलजीवन उपक्रमांमुळे सुध्दा मोठ्या प्रमाणावर जैविक व अजैविक प्रदूषके जमा होत आहेत. (सक्सेना, 2012).

## समुद्री प्रदेश

समुद्री प्रदेश पृथ्वीचा तीन चतुर्थांश पृष्ठभाग सामावून घेतात आणि यामध्ये महासागर, प्रवाळ बेटे, आणि नदी मुखांचा समावेश होतो. समुद्री शेवाळ जगातील सर्वात मोठा ऑक्सिजन पुरवठा करते आणि मोठ्या प्रमाणावर वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेते. समुद्राच्या पाण्याच्या बाष्पीभवनामुळे जमिनीला पाऊस मिळतो.

### 1.7.2.5 महासागर

सर्व परिस्थितीक व्यवस्थांपैकी सर्वात मोठा असलेला महासागर म्हणजे प्रचंड मोठे जलाशय असतात जे पृथ्वीच्या पृष्ठभागावर अधिराज्य करतात. तलाव आणि सरोवरांप्रमाणे, महासागराचा प्रदेश विविध स्वतंत्र क्षेत्रांमध्ये विभागला जातोः भरती–ओहोटीच्या मधील क्षेत्र, महासागरीय, महासागराचे सखोल क्षेत्र, आणि पाण्याचा तळ. सर्व चारही क्षेत्रांमध्ये प्रजातींचे उत्तम वैविध्य आहे. काही लोक म्हणतात की जमिनीपेक्षा महासागरात जरी मोजक्या प्रजाती असल्या, तरी त्यामध्ये प्रजातींचे वैविध्य समृध्द आहे.

भरती–ओहोटीच्या मधील क्षेत्र जिथे महासागर जमिनीला मिळतो– ते कधीकधी विलीन होते आणि इतर वेळा उघडे पडलेले असते, कारण भरती व ओहोटी चालूच असते. त्यामुळे येथील समुदाय सातत्याने बदलत असतात. खडकाळ किनारपट्ट्यांवर हे क्षेत्र उभ्या थरांमध्ये असते. जिथे केवळ सर्वोच्च लाटा पोहोचतात तिथे शेवाळांच्या आणि मृदूकाय प्राण्यांच्या केवळ मोजक्या प्रजाती असतात. ही क्षेत्रे सहसा भरतीच्या वेळी पाण्याखाली जातात, तिथे शेवाळ आणि लहान प्रजातींची अधिक वैविध्यपूर्ण मालिका असते, जसे की शाकाहारी गोगलगाई, खेकडे, समुद्री तारे आणि लहान मासे. भरती–ओहोटीच्या मधील क्षेत्राच्या तळाशी, जे केवळ ओहोटीच्या वेळीच उघड होते त्यामध्ये, अनेक अपृष्ठवंशी, मासे आणि समुद्री गवत आढळते. भरती–ओहोटीच्या मधील क्षेत्र किंवा अधिक वालुकामय किनारपट्ट्या ह्या खडकाळ भागांइतक्या थरांच्या नसतात. लाटांमुळे चिखल आणि वाळू सतत हलत असते, त्यामुळे अतिशय मोजके शेवाळ आणि वनस्पती स्वतःला प्रस्थापित करू शकतात – ह्या जिवांमध्ये जंतू, क्लॅम्स, भक्षक कवची अपृष्ठवंशीय, खेकडे आणि किनाऱ्यावरील पक्षांचा समावेश होतो.

महासागराच्या क्षेत्रामध्ये जमिनीपासून दूर, प्रामुख्याने खुल्या महासागरापासून दूर असलेल्या पाण्याचा समावेश होतो. महासागराचे क्षेत्र हे सहसा थंड असते, ह्याची सर्वसाधारण तापमान श्रेणी देणे अवघड असते, कारण तलाव व सरोवरांप्रमाणेच, गरम आणि थंड सागरी प्रवाहांचे सतत मिश्रण चालू असते त्यामुळे तिथे उष्णतेचे संस्तरण होत असते. महासागराच्या क्षेत्रातील वनस्पतींमध्ये पृष्ठभागावरील समुद्री गवताचा समावेश होतो. जिवांमध्ये माशांच्या अनेक प्रजाती आणि काही सस्तन प्राणी, जसे की व्हेल्स आणि डॉल्फिन्सचा समावेश होतो. त्यांतील अनेकांचे विपुल अशा प्लँक्टनवर पोषण होते.

तळाशी असलेला भाग म्हणजे महासागरी क्षेत्राखालील भाग, परंतु त्यामध्ये महासागराचा अतिशय खोल भाग येत नाही (खाली महासागराचे सखोल क्षेत्र पाहा). क्षेत्राच्या तळाशी वाळू, वाहून आलेला गाळ आणि/किंवा मृत जिवांचा समावेश होतो. इथे महासागराच्या सखोल क्षेत्रामध्ये खोली वाढते त्यामुळे तापमानात घट होते, कारण अधिक खोल पाण्यात प्रकाश झिरपू शकत नाही. येथील वनस्पतींमध्ये प्रामुख्याने समुद्री गवत असते तर जिवांमध्ये सर्व प्रकारचे जिवाणू, बुरशी, स्पंज, समुद्री ऍनेमन्स, जंतू, समुद्री तारे आणि माशांचा समावेश होतो, कारण हा भाग अतिशय पोषक असतो.

खोल महासागर हे महासागराचे सखोल क्षेत्र असते. ह्या प्रदेशातील पाणी खूप थंड असते (साधारण 3° से), त्यावर खूप दबाव असतो, ऑक्सिजनचे प्रमाण भरपूर असते, परंतु पोषक घटक कमी असतात. महासागराचे सखोल क्षेत्र अनेक अपृष्ठवंशी प्रजाती आणि माशांना आधार देते. मध्य–महासागरातील उंचवटे (टेक्टोनिक प्लेट्सदरम्यान पसरलेली क्षेत्रे), बऱ्याचदा महासागराच्या सखोल क्षेत्रात महासागराच्या जमिनींशेजारी हायड्रोथर्मल छिद्रे आढळतात. ह्या छिद्रांजवळ केमोसिंथेटिक जिवाणू वाढतात, कारण त्यातून मोठ्या प्रमाणात हायड्रोजन सल्फाईड आणि इतर खनिजे उत्सर्जित होतात. अशाप्रकारे हे जिवाणू अन्न साखळीचा प्रारंभ आहेत कारण त्यांना अपृष्ठवंशी आणि मासे खातात.

## 1.7.2.6 Coral reefs

Coral reefs are widely distributed in warm shallow waters. Coral reefs are formed by colonies of coral polyps which are marine animals that belong to Class Anthozoa of Phylum Cnidaria (earlier known as Coelenterata).They can be found as barriers along continents (e.g., the Great Barrier Reef off Australia), fringing islands and atolls. Naturally, the dominant organisms in coral reefs are corals. Corals are interesting since they consist of both algae (zooxanthellae) and tissues of animal polyp.

Since reef waters tend to be nutritionally poor, corals obtain nutrients through the algae via photosynthesis and also by extending tentacles to obtain plankton from the water. Besides corals, the fauna include several species of microorganisms, invertebrates, fishes, sea urchins, octopuses and sea stars.

Phylum Cnidaria contains over 10,000 species of animals found exclusively in aquatic and mostly marine environments. Their distinguishing feature is cnidocytes, specialised cells that they use mainly for capturing prey. A coral 'head' is a colony of thousands of genetically identical polyps. Each polyp is a spineless animal typically only a few millimetres in diameter and a few centimetres in length with an exoskeleton base and a set of tentacles surrounding a central mouth opening. Over many generations, the colony thus creates a large skeleton that is characteristic of the species. Most coral reefs are built from stony corals. Coral reefs are often called 'rainforests of the sea' as they are highly diverse ecosystems because of the variety of niches provided by the reef structures.

The most important ecosystem services that coral reefs deliver are to tourism, fisheries and shoreline protection.

There are three principal reef types:

**Fringing reef** – directly attached to a shore, or borders it with an intervening shallow channel or lagoon;

**Barrier reef** – a reef separated from a mainland or island shore by a deep channel or lagoon; and

**Atoll reef** – this more or less circular or continuous barrier reef extends all the way around a lagoon without a central island.

In India, the reefs are distributed along the east and west coasts at restricted places and all the three major reef types (atoll, fringing and barrier) occur.

## 1.7.2.6 प्रवाळ बेटे

प्रवाळ बेटे उबदार उथळ पाण्यांमध्ये विस्तृतपणे पसरलेली असतात. प्रवाळ बेटे ही प्रवाळ पॉलिप्स या समुद्री प्राण्यांच्या कॉलनींनी तयार होतात, जे क्लास अँथोझोआ ऑफ फायलम सिंडारिया (आधी कोलेंटेराटा म्हणून ज्ञात होता) मध्ये येतात. खंडांभोवती अनुतट व बेटे निर्माण करून अडथळे बनवतात (उदा., द ग्रेट बॅरिअर रीफ ऑफ ऑस्ट्रेलिया). अर्थातच, प्रवाळ बेटांमधील प्रबळ जीव हे प्रवाळ असतात. प्रवाळ हे खूप रोचक असतात, कारण ते शेवाळ (zooxanthellae) आणि प्राण्यांच्या पॉलीप उती दोन्हींचे बनलेले असतात.

बेटांचे पाणी हे पोषणाच्या बाबतीत वाईट असल्यामुळे, प्रवाळांना शेवाळांद्वारे प्रकाश संश्लेशण करून आणि पाण्यातून प्लँक्टन मिळवण्यासाठी स्पर्शके (टेन्टॅकल्स) लांब विस्तारून पोषक घटक मिळतात. प्रवाळांव्यतिरिक्त, जिवांमध्ये अनेक सूक्ष्मजीवांच्या प्रजाती, अपृष्ठवंशी, मासे, समुद्री अर्चिन्स, ऑक्टोपस आणि समुद्री तार्‍यांचा समावेश होतो.

फायलम सिंडारियामध्ये प्राण्यांच्या 10,000 हून जास्त प्रजाती येतात ज्या खास करून जलीय आणि बहुतांश समुद्री पर्यावरणात आढळतात. त्यांना वेगळे करणारे वैशिष्ट्य आहे निडोसाईट्स ह्या विशिष्ट पेशी, ज्या ते भक्ष पकडण्यासाठी वापरतात. प्रवाळाचा 'माथा' ही हजारो जनुकीयरित्या समान पॉलिप्सची कॉलनी असते. प्रत्येक पॉलिप हा कणाहीन प्राणी असतो जो सहसा केवळ काही मिलिमीटर व्यासाचा आणि काही सेंटिमीटर लांबीचा असतो आणि ज्याचा बाह्यकंकालाचा पाया आणि मध्यभागी उघडणार्‍या तोंडाच्या भोवती असलेल्या स्पर्शकांच्या (टेन्टॅकल्स) संचाने बनतो. अनेक पिढ्यांनंतर, ह्या कॉलनी मोठा सांगाडा तयार करतात जे त्या प्रजातीचे गुणवैशिष्ट्य बनते. बहुतांश प्रवाळ बेटे दगडाच्या प्रवाळांपासून बनलेली असतात. प्रवाळ बेटांना बर्‍याचदा 'समुद्राची पर्जन्यवने' म्हणतात कारण बेटाच्या रचनांमुळे मिळालेल्या वैविध्यपूर्ण खाचांनी त्यांच्या वैविध्यपूर्ण परिस्थितीक व्यवस्थेमध्ये खूप विविधता असते.

प्रवाळ बेटे देत असलेली सर्वात महत्वाची परिस्थितीक व्यवस्था सेवा आहे पर्यटन, मत्स्यव्यवसाय आणि किनारपट्टीचे संरक्षण.

तीन प्रमुख प्रकारची बेटे आहेतः

**अनुतट बेट** – थेट किनार्‍याला संलग्न असलेले किंवा हस्तक्षेप करणार्‍या उथळ प्रवाह किंवा खार्‍या पाण्याच्या सरोवरास किनार करणारे;

**रोधक बेट** – मूख्य भूप्रदेश किंवा बेटाच्या किनार्‍यापासून खोल प्रवाह किंवा खारकच्छ ने स्वतंत्र झालेले बेट; आणि

**कंकण बेट** – हे जास्त करून वर्तुळाकार असते किंवा मध्यवर्ती बेटाविना अडथळा करणारे बेट खारकच्छला वेढा पूर्ण करते.

भारतामध्ये, बेटे निर्बंधित ठिकाणांमध्ये पूर्व आणि पश्चिम किनारपट्ट्यांवर वितरीत झालेली आहेत आणि सर्व प्रमुख तीन प्रकारची बेटे आढळतात (कंकण, अनुतट आणि रोधक).



© Photo: Deepak Apte

Off the mainland coast of India, the Gulf of Kachchh in the northwest, and Palk Bay and Gulf of Mannar in the southeast, are the two major areas where coral reefs are found.

There are patches of reef growth on the west coast, for example coral reefs at Ratnagiri and Malvan for which protection has been given by declaring that area as an MPA. The Andaman and Nicobar Islands have fringing reefs around many islands, and a long barrier reef (329 km) on the west coast. In the Lakshadweep, there are 10 atolls with 36 islands. All the atolls are surrounded by prolific reefs.

The commonest corals are Acropora spp., Porites spp., Diploastrea, Heliopora, Goniastrea retiformis and Lobophyllia corymbosa. [Source: NCSCM Special Publication: Lagoons, Lives and Livelihood]

There are amazing coral reefs among the Lakshadweep and Andaman groups of islands. The Andaman and Nicobar Islands represent unique assemblages of plants and animals and also exhibit inter-island variation and uniqueness.

Coral reefs are critical to the fisheries and protecting coasts from wave action and erosion (Middleton 1999; Ruddle et al 1988). However, they are undergoing rapid destruction (due to a number of factors including destructive fishing techniques; reef mining for calcium carbonate production; siltation as a result of deforestation; sedimentation; marine pollution with contaminants; freshwater dilution; sub-aerial exposure and disease; and global warming and climate change are posing an additional emerging and severe threat to already stressed coral reefs.

The rising sea level and changed weather patterns, such as altered El Niño and La Niña events, are already affecting coral reefs. In 1998, the tropical sea surface temperatures (SSTs) were the highest on record (the culmination of a 50 year trend), and coral reefs suffered the most extensive and severe bleaching (loss of symbiotic algae) and death on record. As a result of this El Niño event in 1998, 16 per cent of the world's coral reefs and 50 per cent of those in the Indian Ocean were destroyed. As such, reef communities have been altered in the region. Although healthy reefs are likely to adapt to projected sea level changes, coral reefs that are already stressed by other human activities and threats will not (UNISDR/UNDP 2012a, 2012b) [ Savarkar 2014, ENVIS publication]

भारताच्या मूख्य भूप्रदेश किनारपट्टीच्या आणि पाल्क बेच्या मागे, उत्तरपश्चिमेला कच्छचे आखात आणि दक्षिणपूर्वेला मन्नारचे आखात हे दोन प्रमुख भाग आहेत जिथे प्रवाळ बेटे आढळतात.

पश्चिम किनारपट्टीवर बेटाच्या वाढीचे तुकडे आहेत, उदाहरणार्थ, रत्नागिरी आणि मालवणमधील प्रवाळ बेटे ज्यांसाठी तो भाग म्हणून जाहीर करून संरक्षण देण्यात आले आहे. अंदमार आणि निकोबार बेटांमध्ये अनेक बेटांभोवती अनुतट बेटे आहेत आणि पश्चिम किनारपट्टीवर लांब अडथळा बेट आहे (329 किमी). लक्षद्वीपमध्ये, 36 बेटांसह 10 कंकणे आहेत. सर्व कंकणांभोवती प्रोलिफिक बेटे आहेत.

सर्वात सामाईक प्रवाळ आहेत ॲक्रोपोरा एसपीपी, पोराईट्स एसपीपी, डिप्लोस्ट्री, हेलिओपोरा, गोनिआस्ट्रा रेटिफॉर्मिस आणि लॉबोफीलिया कॉरीम्बोसा. (स्त्रोतः NCSCM विशेष प्रकाशनः लगून्स, लाईव्ज अँड लाईव्हलीहूड)

लक्षद्वीप आणि अंदमान बेटांच्या समूहामध्ये विस्मयकारक प्रवाळ बेटे आहेत. अंदमान आणि निकोबार बेटे वनस्पती आणि प्राण्यांची वैशिष्ट्यपूर्ण मंडळे आहेत आणि त्यांवर बेटांतर्गत वैविध्य आणि विशिष्ठता आढळते.

प्रवाळ बेटे मत्स्योत्पादनासाठी महत्वाची असतात आणि किनारपट्ट्यांचे लाटांच्या हालचाली व धूप होण्यापासून संरक्षण करतात (मिडलटन 1999, रुडल एट अल 1988). तथापि, त्यांचा वेगाने विनाश होत आहे (अनेक घटकांमुळे ज्यांमध्ये विनाशकारी मासेमारी तंत्रे; कॅल्शियम कार्बोनेटच्या उत्पादनासाठी बेटे खोदणे; जंगलतोड आणि सेडिमेंटेशनमुळे सिल्टेशन; प्रदूषित घटकांमुळे समुद्री प्रदूषण; ताजे पाणी सौम्य होणे; हवेला उघड होणे आणि रोग; आणि जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदल हे आधीच तणावाखाली असलेल्या प्रवाळ बेटांना अतिरिक्त उद्‌भवणारे आणि तीव्र धोके निर्माण करत आहे.

समुद्राची वाढती पातळी आणि पाण्याच्या हवामानाचे बदलते पॅटर्न्स, जसे की बदललेल्या अल निनो आणि ला निना घटना, आधीच प्रवाळ बेटांना प्रभावित करत आहेत. 1998 मध्ये उष्णकटिबंधीय समुद्री पृष्ठभागाची तापमाने (SSTs) सर्वोच्च नोंदवली गेली (50 वर्षांतील ट्रेंडचा कळस) आणि प्रवाळ बेटांना सर्वाधिक तीव्र आणि जास्त ब्लीचिंग सोसावे लागले (सहजीवी शेवाळांचे नुकसान) आणि सर्वाधिक मृत्यू नोंदवले गेले. 1998 मधील या अल निनो घटनेमुळे जगातील 16 टक्के प्रवाळ बेटे आणि ज्यांतील 50 टक्के हिंदी महासागरात होती ती नष्ट झाली. आत्तापर्यंत, त्या प्रदेशातील बेटांच्या समुदायांत बदल घडले आहेत. समूद्राच्या पातळीत होणारे अंदाजे बदल सुदृढ प्रवाळ बेटे अंगिकारण्याची जरी शक्यता असली तरी, मानवी हालचालींमुळे आणि धोक्यांमुळे ज्या प्रवाळ बेटांवर आधीच तणाव आला आहे ती टिकणार नाहीत. (UNISDR/UNDP 2012a, 2012b) (सावरकर 2014ए एनव्हिस प्रकाशन)



# 1.8 The story of Seagrasses and Dugong

### Seagrasses

The only flowering plants that have colonised the ocean floor for many millions of years are seagrasses. They are believed to have originated on land but are now, except for one genus, completely adapted to living underwater. They thrive in shallow coastal seas as they require light for photosynthesis, in areas that are calm where there is shelter from wind and water currents.

Seagrasses occur in the intratidal and midtidal zones of shallow and sheltered localities of seas, gulfs, bays, back- waters and lagoons. They are monocots, related to lilies and gingers, with rhizomes to which leaves are attached. The extent of seagrass meadows depends on the clarity of water which in turn decides the availability of sunlight.

Seagrass ecosystems are an important coastal habitat for a number of species. A number of animals such as the dugong, turtles, sea urchins and some fish directly feed on the leafy blades. They also provide an excellent habitat for a number of species, including varieties of prawn and fish.

The major seagrass meadows in India are found along the southeast coast (Gulf of Mannar and Palk Bay) and in the lagoons of islands from Lakshadweep in the Arabian Sea to Andaman and Nicobar in the Bay of Bengal. Fourteen species of seagrasses are found along the Indian coast. While the Tamil Nadu coast harbours all fourteen species, eight or nine species are found in other places. Meadows are mostly heterospecific; some meadows in Lakshadweep are mono or bispecific.

Natural threats to seagrass ecosystems in India are cyclones and strong waves as well as grazing. New threats are due to changing sea levels as well as changes in water quality, especially acidification. Anthropogenic threats include the increased sediment load in the water from various sources which reduces the light availability for photosynthesis. Construction of harbours and jetties, dredging and discharge of effluents are important causes for destruction of seagrass habitats. [Source: NCSCM Special Publication: Lagoons, Lives and Livelihood]

Higher water temperatures resulting from climate change will affect growth, reproduction and general metabo- lism of seagrasses, while increased acidity will affect their productivity (Bjork et al, 2008; Short and Neckles, 1999). Increased numbers of storms will also result in physical damage to seagrass meadows and increase the turbidity of the water, affecting the availability of light for photosynthesis (Bjork et al 2008). [ Savarkar 2014, ENVIS publication]

### Dugongs

Dugongs (Dugong dugon Müller, 1776), also known as sea cows, are herbivorous marine mammals belonging to the family Dugongidae and order Sirenia. It is one of the four surviving species in the order Sirenia, and it is the only existing species of herbivorous mammal that lives exclusively in the sea, including Indian waters.



# 1.8 ड्युगॉग आणि समुद्र गवत यांची कहाणी

### समुद्री गवत/सागरी गवत

लाखो वर्षांपासून सागर तळाशी वसाहती असलेल्या एकमात्र सपुष्प वनस्पती म्हणजे समुद्री गवत आहेत. त्यांचा उदय जमिनीवर झाला आहे असे मानले जाते. अपवादात्मक एक प्रजाती वगळता, समुद्री गवताच्या सर्व प्रजाती जलीय वातावरणाशी समरस झाल्या आहेत. प्रकाश संश्लेषणासाठी प्रकाश आवश्यक असल्यामुळे, त्यांची वाढ समुद्राच्या उथळ किनाऱ्यांवर होते. ते अशा ठिकाणी वाढतात, जेथे समुद्रकिनारे शांत असतात व त्या ठिकाणी समुद्र प्रवाह किंवा वाऱ्याचा उपद्रव नसतो.

समुद्री गवत समुद्र, आखात, खाडी, पश्च–जल आणि खारकच्छ यांच्या निथळ आणि संरक्षित वसाहतींच्या इंट्राटायडल आणि मिडटायडल क्षेत्रांमध्ये आढळतात. ते लिली आणि आल्याशी संबंधित एकबीजपत्री असतात आणि मूलस्तंभांसह असतात, ज्यांची पाने जोडलेली असतात. समुद्री गवताच्या कुरणांचे प्रमाण पाण्याच्या स्वच्छतेवर निर्भर असते, ज्यामुळे त्यांना उपलब्ध होणाऱ्या सूर्यप्रकाशाचे प्रमाण ठरत असते.

समुद्री गावात परिस्थितीक व्यवस्था अनेक प्रजातींसाठी एक महत्त्वाचे किनारी वस्त्या असतात. ड्युगॉग मासे, कासव, सी अर्चीन्स आणि काही मासे यांच्यासारखे अनेक प्राणी या पानांच्या पात्यांवर थेट आपले पोषण करतात. तसेच ते कोळंबी आणि मासे यांच्या अनेक प्रकारांच्या समवेत बहुसंख्य प्रजातींसाठी हे एक उत्कृष्ट वस्त्या देखील पुरविते.

भारतामध्ये सागरी गवताच्या प्रमुख प्रजाती दक्षिण किनारपट्टीवर (मन्नार व पाकची सामुद्रधानी) आढळतात. तसेच अरबी समुद्रातील लक्षद्विप बेटे आणि बंगालचा उपसागरातील अंदमान–निकोबार बेटांवरही सापडतात. भारतीय किनारपट्टीवर एकूण 14 प्रजाती आढळतात. तामिळनाडूच्या किनारपट्टीवर सर्व 14 प्रजाती, तर इतर ठिकाणी 8 ते 9 प्रजाती वाढतात. ह्या प्रजातींमध्ये वैविध्य आढळते.

सागरी गवताला वादळे आणि अतिप्रचंड लाटांचा आणि तसेच चरण्याचा नैसर्गिक धोका असतो. त्याचप्रमाणे समुद्राच्या पातळीतील बदल, पाण्याची गुणवत्ता, खास करून आम्लतेतील वाढ हेही धोका पोहोचवतात. समुद्रात मिसळल्या जाणाऱ्या घनप्रदुषकांमुळे पाण्याची स्वच्छता कमी होते आणि प्रकाशकिरण तळापर्यंत पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे प्रकाश संश्लेषण क्रियेवर परिणाम होतो. बंदरे आणि घाट बांधल्यामुळे, गाळ उपसा केल्यामुळे तसेच विविध प्रकारची प्रदुषके पाण्यात सोडल्यामुळे मोठ्या प्रमाणावर सागरी वस्त्यांना हानी पोहोचते. (परिशिष्ठ – NCSCM विशेष प्रकाशनः– लगून्स, लाईव्हस आणि लाइव्हलीहूड)

बदलत्या हवामानामुळे पाण्याचे तापमान वाढते. त्याचा परिणाम सागरी गवताच्या वाढीवर, प्रजनन क्षमतेवर तसेच सामान्य चयापयच क्रियेवर होतो, तर वाढलेल्या आम्लतेमुळे त्याच्या उत्पादकतेवर परिणाम होतो. (बीजॉर्क एट अल, 2008– शॉर्ट ॲन्ड नेकल्स 1999). मोठ्या प्रमाणावरील झंझावतांमुळे सागरी गवत नष्ट होते. तसेच वाढत्या गढूळतेमुळे प्रकाश संश्लेषणासाठी प्रकाश किरणांची कमतरता जाणवते. (बीजॉर्क एट अल, 2008) (सावरकर 2014, एनविस प्रकाशन).

### ड्युगॉग्स

ड्युगॉग्स (ड्युगॉग ड्युगॉन मुल्लर, 1776) किंवा समुद्रगायी शाकाहारी असतात. त्यांचा समावेश ड्युगोंगिडी कुळात आणि सिरेनिआ वंशात केला जातो. त्यामधील चारपैकी एकमेव अस्तित्वातील शाकाहारी सस्तन जलचर आहे. केवळ समुद्रात राहणारी ही एकमेव अस्तित्वातील शाकाहारी सस्तन प्रजाती आहे, जी भारतीय समुद्रांमध्ये देखील आढळते.

The dugong (Dugong dugon) is a grey brown animal that looks a bit like a cross between a seal and a whale. It has a powerful fluked tail and small front flippers, which act like paddles to stabilise it when it swims. The forelimbs are also used for scratching, mouth-cleaning and supporting the body when resting on the bottom. The movement of a dugong is often slow and graceful. It measures 2-4 metres in length and weighs up to 400 kg. An air-breathing mammal, totally adapted to life in the sea, the dugong spends much of its time grazing on seagrasses. It is for this reason that it is often called a sea cow.

Dugongs are shy, secretive animals that are very difficult to approach. They have poor eyesight, but their hearing is sharp. Even though the external ear opening is tiny, their large internal ears enable them to hear well, both on the surface and under water. Dugongs are capable of staying submerged for six minutes or more. They must surface regularly, albeit for only 1–2 seconds at a time (Anderson 1981). They are hard to see as they can take a breath by exposing only the nostrils, which are placed on the top of their snout.

They are distributed in the Indo-Pacific region and their diet consists mostly of seagrasses of the genera Cymodocea, Halophila, Thalassia and Halodule (Marsh et al, 1999, 2002).

### Breeding behaviour

Dugongs can live for about 70 years. They breed very slowly, and females start breeding when they are aged between 10 and 17 years. Breeding occurs throughout the year, and peak months for birth vary geographically. The exact length of gestation is unknown, but it is presumed to be about 12–14 months (Marsh, 1986). Single calves are the norm and twins are rare. Parturition takes place in shallow water, and newborn calves are able to swim immediately to the surface for their first breath of air.

### Feeding behaviour

The dugongs are the only strictly marine herbivores and feed mainly on seagrasses. If the seagrass is short, they root at the bottom, eating rhizomes, stems and leaves, and cause sediments to cloud the water. If the seagrass is tall, they just strip the leaves from the stems.

Seagrass has low nutritional value, and so dugongs must consume vast amounts. In captivity, they eat 20 to 30 kg a day.

### Habitat use and movement

Dugongs inhabit shallow tropical coastal waters and are more strictly marine thanare manatees. Since their main source of food is seagrasses, by and large theirhabitat mirrors that of seagrasses. Thus, they are shallow-water animals feeding in waters just a few metres deep. Long-distance migration of dugongs is unknown, butsome daily and seasonal movements do occur in some populations. The tides, watertemperature and food abundance are probably the main factors involved in these movements.

### Economic and cultural significance

Traditionally dugongs were hunted by some tribes in the Andaman andNicobar Islands, fishermen and local people in Tamil Nadu and Sri Lanka. However,currently, due to their low abundance, dugongs are not the target species forhunting in most of these areas. The Onge, on Little Andaman, use bones of dugongs(tusks, rib bones, pelvic/pectoral girdles) as ornaments.

This number and the range of the dugong are believed to be continuously declining. Several reasons have been attributed to the decline in the dugong population, including seagrass habitat loss and degradation, gill netting, disease, water pollutants, indigenous use and poaching. Restricted to the inshore waters due to their dependence on seagrass beds, dugongs remain vulnerable to hunting, boat strikes and habitat disturbances . Additionally, incidental entanglement in gill nets has been identified as one of the prime causes of the decline of the dugong population in all the sub-regions of its current distribution, which extends across the waters of 37 countries (Marsh et al, 2002).

ड्युगॉग्स (ड्युगॉग ड्युगॉन) चा रंग तपकिरी करडा असून ते सील–मासे व देवमाश्यांच्या संकरातून तयार झाल्यासारखे वाटतात. ड्युगॉगची शेपटी सक्षम असून त्यांना छोटे पुढचे पर असतात. त्यांचा उपयोग वल्ह्यासारखा करून ते पाण्यामध्ये पोहताना स्थिरावतात. पुढच्या परांचा उपयोग पोहोण्यासाठी, तोंड स्वच्छ करण्यासाठी तसेच समुद्राच्या तळाशी असताना शरीराला आधार देण्यासाठी होतो. ड्युगॉगच्या हालचाली अत्यंत संथ पण डौलदार असतात. त्यांची लांबी 2–4 मीटर , तर वजन 400 किग्रॅ असते. ते वायुश्वासी असतात आणि त्यांची जीवनशैली पाण्यामध्ये राहण्यासाठी सरावलेली असते. ते सतत सागरी गवत चरत असतात. त्यामुळेच त्यांना सहसा सागरी गायी असे म्हणतात.

ते अतिशय भित्रे आणि चपळ असतात. त्यामुळे त्यांचा पाठलाग करणे अवघड असते. त्यांची दृष्टी अधू असते. पण श्रवणशक्ति तीक्ष्ण असते. त्यांचा बाह्यकर्ण लहान तर अंतर्कर्ण मोठा असतो. त्यामुळे त्यांना पाण्यावरील तसेच पाण्यातील ध्वनीलहरींच्या संवेदना वेगाने ग्रहण करता येतात. ते पाण्याखाली सहा मिनिटांपेक्षा जास्त काळ राहू शकतात. त्यांना किमान 1 ते 2 सेकंदासाठी सातत्याने पाण्याच्या पातळीवर श्वसनासाठी यावे लागते (अँडरसन 1981). ड्युगॉग त्यांच्या फक्त नाकपुड्या पाण्याच्या पृष्ठभागाबाहेर काढतात त्यामुळे पटकन दिसत नाहीत.

ते भारतीय व प्रशांत महासागरादरम्यान आढळतात आणि सागरी गवताच्या सायमोजेसिआ, हॅलोफिला, थॅलॅसिया आणि हॅलोड्यल ह्या प्रजाती खाऊन गुजराण करतात. (मार्श एट अल, 1999, 2002)

### प्रजनन पद्धती

ड्युगॉगची आयुमर्यादा 70 वर्षे असते. त्यांची प्रजनन प्रक्रिया अत्यंत संथ असते. वयाच्या 10 ते 17 वर्षादरम्यान मादी प्रजननशील असते. त्यांचे प्रजनन वर्षभर चालू असते. कमाल प्रजनन काल बदलत असतो. त्यांचा गर्भधारणा काळ निश्चित माहीत नाही. तो 12–14 महिने असू शकतो. (मार्श 1986) सर्वसाधारणपणे एका वेळेस एकाच अपत्याला जन्म दिला जातो. क्वचित दोन अपत्ये जन्म घेतात. उथळ पाण्यात पिल्ले बाहेर सोडली जातात. लगेचच पिल्ले पोहायला लागतात आणि पृष्ठभागावर श्वसनासाठी येतात.

### अन्नसेवन

ड्युगॉग हे खाऱ्या पाण्यातील शाकाहारी प्राणी असून ते सागरी गवतावर गुजराण करतात. सागरी गवत लहान असल्यास पाने, खोड, मुळापर्यंत भक्षण करतात. त्याचे कणकण तुकडे पाण्यात मिसळले जाऊन पाणी प्रदुषित होते. जर सागरी गवत उंच असेल तर ड्युगॉग त्यांची पाने खोडापासून तोडतात.

सागरी गवताचे पोषणमूल्य कमी असते. त्यामुळे ड्युगॉगना मोठ्या प्रमाणावर सागरी गवताचे भक्षण करावे लागते. ते दररोज 20 ते 30 किलो गवत खातात.

### वस्त्याचा वापर आणि हालचाल

ड्युगॉग उथळ समशितोष्ण किनाऱ्यांवर आढळतात. ते फक्त खाऱ्या पाण्यातच जगतात. सागरी गवत खाद्य असल्यामुळेच ते उथळ समुद्र किनाऱ्यांवर राहणे पसंत करतात. ते फार लांबवर पोहत जात नाहीत. ड्युगॉगचे फार मोठ्या अंतरावरील स्थानांतरण ज्ञात नाही, पण त्यांच्या हालचाली थोड्या फार प्रमाणावर ऋतू बदलाशी निगडीत असतात. असे काही ड्युगॉगबाबत जाणवते. भरती–ओहोटी, पाण्याचे तापमान आणि मोठ्या प्रमाणावर खाद्याची उपलब्धता ह्या महत्त्वाच्या बाबी त्याच्या संचारासाठी कारणीभूत ठरतात.

### आर्थिक व सांस्कृतिक महत्त्व

पूर्वीच्या काळी अंदमान–निकोबार बेटांवरील काही जमाती व तमिळनाडू व श्रीलंकेच्या किनारपट्टीवरील राहणारी मच्छीमार आणि सर्वसामान्य माणसे ड्युगॉगची मोठ्या प्रमाणावर शिकार करत असत. तथापि आता त्यांची संख्या कमी झाल्यामुळे त्यांच्या शिकारीचे प्रमाण कमी झाले आहे. छोट्या अंदमान बेटावरील ओंजे जमातीचे लोक ड्युगॉगच्या हाडांचा वापर (सुळे, फासळी, श्रोणी/छातीची हाडे) करून दागिने बनवितात.

अनेक कारणांमुळे दिवसेंदिवस ड्युगाँगची संख्या आणि क्षेत्र जात असल्याचे मानले जात आहे.. सागरी गवताच्या वस्त्यांची क्षति, पाण्यातील वाढते प्रदुषण, गिल नेटिंग, रोग, त्यांची होणारी शिकार ही मुख्य कारणे होत. सागरी गवताचे वितरण कमी झाल्यामुळेही ड्युगॉगच्या शिकारीचे प्रमाण वाढले आहे. दैनंदिन जहाजांच्या हालचालींमुळे वस्त्याची हानी होत आहे.. 37 देशांच्या जलस्त्रोतांमध्ये पसरलेल्या त्याच्या वर्तमान स्थितीत सर्व उप–प्रदेशांमधील ड्युगाँगच्या संख्येतील कमीसाठी सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे मच्छिमारांनी टाकलेल्या जाळ्यांमध्ये ड्युगॉग अडकणे हे आहे. (मार्श एट. अल, 2002)

### Status of regional conservation measures

Assessed as vulnerable by the International Union for Conservation of Nature (IUCN), the dugong is considered to be facing a high riskof extinction in the wild. In India, dugongs are protected under Schedule-I of the Wildlife (Protection) Act, 1972 (WPA), which makes hunting, killing and capture of dugongs and buying and selling dugong meat punishable by imprisonment. The Government of India is a signatory to Convention on International Trade in Endangered Species (CITES), and dugongs are listed in Appendix-I ofCITES, which prevents international trade in the species. At present, a few dugong habitats fall within the existing protected area network, for example, the Gulf of Kachchh Marine Protected Area (22°34° N, 69°40° E), Gulf of Mannar Marine NationalPark (9°07° N, 79°36° E) and Mahatma Gandhi Marine National Park (11°34° N, 92°39° E).In April 2008, the Government of India signed the Memorandum of Understanding (MoU)on the Conservation and Management of Dugongs and their Habitats throughout their Range [United Nations Environmental Program – Convention on Migratory Species (UNEP-CMS) Dugong MoU] to strengthen the protection and management of dugongs and their habitats in Indian waters with the support ofthe international community. The UNEP-CMS Dugong MoU, which has 11 range states todate as signatories (Australia, Eritrea, France, Madagascar, Myanmar, the UnitedArab Emirates, the United Republic of Tanzania, India, the Comoros, Kenya and the Philippines), provides a platform for coordinating conservation and management throughout the dugong's extensive range to ensure its long-term survival.Dugong is one of the eight critically endangered species identified by the Ministry ofEnvironment and Forests, Government of India, under the species recovery component of the Integrated Development of Wildlife Habitats (CSS-IDWH), a centrally sponsored scheme. Additionally, a Task Force for Conservation of Dugongs was constituted to ensure implementation of the UNEP-CMS Dugong MoU in India and to prepare an action plan aimed at increasing dugong numbers and preventing degradation of its habitat. Seagrasses provide a habitat for Dugong dugon, the only herbivorous marine mammal. Because of their growth pattern, they also provide exceptional habitats for a wide variety of marine organisms, both plant and animals.

